रायगड, नवी मुंबई
वर्ष १७ ◆ अंक ३०९
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, २७ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
कोकण रेल्वे भारतीय रेल्वेत विलीनीकरणास मान्यता/२
'आपत्कालीन परिस्थितीत अलर्ट मोडवर काम करा'/५
प्रियांक पांचाळची क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती/८



# मुसळधार!
## २४ तासात १४०.५६ मिमी पर्जन्यवृष्टी
## रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपले

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याला रविवारी रात्रीपासून पडलेल्या मुसळधार पावसाने झोडपून काढले. जिल्ह्यात गेल्या २४ तासात १४०.५६ मिमी सरासरीने पाऊस पडला. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी आले. काही ठिकाणी रस्ते खचले. झाडे उन्मळून पडली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सोमवारी (दि. २६) दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती.

मान्सून तळकोकणात दाखल झाला असतानाच रायगड जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाच्या जोरदार सरी बरसत आहेत. रविवारी रात्रीपासून पावसाने रायगड जिल्ह्याला झोडपून काढले. मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली. या तिन्ही तालुक्यात २४ तासात ३०० मिलीमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली. मुरूड तालुक्यात सर्वाधिक ३७१ मिमी पाऊस पडला.

अलिबाग, पनवेल, उरण परिसरात विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाची संततधार सुरू होती. महाड, पोलादपूर, माणगाव, रोहा परिसरात रविवारी संध्याकाळपासूनच सुरू झालेल्या जोरदार पावसाने सर्वत्र पाणी पाणी झाले. रोहा शहरातील दमखाडी भागात मुख्य रस्त्यावर पाणी साचले. ग्रामीण भागात छोटे नाले ओसंडून वाहत आहेत. अतिवृष्टीमुळे कुंडलिका, पाताळगंगा, आंबा, सावित्री नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे.

किल्ले रायगडावर जाणाऱ्या मार्गावर कोंझर येथे भगदाड पडल्याने या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. डोंगरातून येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे मोरी गेली वाहून गेली, तर रस्ता खचला. जोरदार पावसामुळे ठिकठिकाणी झाडे रस्त्यावर उन्मळून पडल्याच्या घटना घडत आहेत. म्हसळा-गोरेगाव मार्गावर खामगाव येथे भलेमोठे झाड रस्त्यावर कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक थांबवण्यात आली. प्रवाशांनी माणगाव-घोणसे घाटमार्गे प्रवास करावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

जोरदार पावसात मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर मोहोपाडा रसायनी हद्दीत किलोमीटर १४/१०० येथे पुणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर दरड कोसळली. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. या वेळी आयआरबी, देवदूत यंत्रणा यांनी दुसरी व तिसरी लाईनवर सेफ्टी कोन लावून बंद ठेवून, तर पहिली लाईन वाहतुकीस चालू ठेवली आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर वावंढळवाडी येथे भलेमोठे आंब्याचे झाड कोसळले. त्यामुळे दोन्ही बाजूकडील वाहतूक दोन तास ठप्प झाली होती. आयआरबीच्या यंत्रणेने झाडाच्या फांद्या तसेच खोड तोडून बाजूला केल्यानंतर येथील वाहतूक सुरळीत झाली. (पान २ वर..)

### २४ तासात पडलेला पाऊस

*अलिबाग ७८ मिमी, मुरूड ३७१, पेण ५०, पनवेल ८२.०४, उरण ५५, कर्जत ५४.०६, खालापूर ६२, माथेरान १८१, सुधागड १०४, माणगाव ६३, तळा १८२, महाड ९९, पोलादपूर ९४, श्रीवर्धन ३०७, म्हसळा ३००, रोहा १६६, एकूण २२४९ मिमी, सरासरी १४०.५६ मिमी.*

### अनेक ठिकाणी नुकसान

जोरदार पावसामुळे १३ कच्च्या घरांचे व २२९ पक्क्या झाले घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. एक झोपडी व एक गोठ्याचे पूर्णतः नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे दोन आरोग्य केंद्र, दोन स्मशानभूमी, एक मच्छीमार सोसायटी, एक पोल्ट्री, पाच सार्वजनिक मालमत्तेचे अंशतः नुकसान झाले. नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरू आहे.

# कोपर स्मशानभूमी तोडक कारवाईला जनआंदोलनातून प्रखर विरोध
## सिडकोचे पथक माघारी; लढा कायम राहणार -लोकनेते रामशेठ ठाकूर





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोनशे वर्षांहून जुनी आणि परंपरागत असलेल्या उलवे नोडमधील कोपर स्मशानभूमीवर तोडक कारवाई करण्यासाठी आलेल्या सिडकोच्या पथकाला ग्रामस्थांच्या वज्रमूठ ताकदीमुळे सोमवारी (दि. २६) रिकाम्या हाती परतावे लागले. पुन्हा कारवाईला आल्यास सिडकोला जशास तसे उत्तर देण्याचा अर्थात प्रखर विरोध करण्याचा निर्धार पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या वेळी व्यक्त केला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पंचक्रोशीतील हजारो नागरिकांनी कोपर स्मशानभूमी बचावासाठी जनआंदोलन उभारले. विजांचा कडकडाट आणि वादळी पाऊस असतानाही आंदोलक मागे हटले नाहीत. या आंदोलनालाची तीव्रता पाहता सिडकोने एक पाऊल मागे येत कारवाईला हात लावला नाही, मात्र यापुढे कारवाई केल्यास आम्हीही तयार आहोत, असा इशारा सिडकोला देण्यात आला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी स्मशानभूमीत पार्थिव जळत असताना त्या ठिकाणी सिडकोच्या भोंगळ कारभाराबद्दल तीव्र संताप व्यक्त करीत निषेध केला. आजचा हा आवाज इशारा आहे, पुन्हा कारवाई करायला याल, तर दोन्ही तालुक्यातील लोकांचे जनआंदोलन उभारू, असा सज्जड दम त्यांनी सिडकोला दिला. जर सिडको पुन्हा असेच निर्णय घेत राहिली आणि जनतेच्या भावनांचा विचार केला नाही, तर सिडकोला रौद्र रोषाला सामोरे जावे लागेल, असेही त्यांनी ठणकावून सांगत ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी कुठलीही पर्वा करणार नसल्याचे स्पष्ट केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, सिडकोने केवळ न्यायालयाची दिशाभूल केली म्हणून ही वेळ आली आहे. एखादी कारवाई करायची असेल, तर नोटीस द्यावी लागते. कोर्टाने अशी कोणतीही मुदत दिली नाही. येथील स्मशानभूमी परंपरागत असून आधी वसलेली आहे, नंतर कॉलनी बनली आहे. त्यामुळे मूळची व्यवस्था तशीच राहिली पाहिजे. कॉलनीवाल्यांना त्रास होऊ नये याची जबाबदारी सिडकोने घ्यायची आहे. हे सगळे न करता आपल्याला उखडून टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. आज त्यांचा स्मशानभूमीच्या जागेवर डोळा आहे. उद्या म्हणतील गावातील इतर सार्वजनिक सुविधादेखील हटवा आणि तिथे स्विमिंग पूल किंवा इतर प्रकल्प उभे करा. सिडकोची ही मनमानी आणि जनतेविरोधी भूमिका खपवून घेतली जाणार नाही. सिडकोचा मनमर्जी कारभार सुरू आहे. तो आपल्याला चालू द्यायचा नाही.

### पुन्हा कारवाईला आल्यास जशास तसे उत्तर देण्याचा निर्धार

पनवेल तालुक्यातील अनेक रहदारीच्या ठिकाणी स्मशानभूमी आहेत. त्यांचा त्रास कोणालाही होत नाही, मात्र कोपर गावातील स्मशानभूमीचा त्रास सिडकोला होतोय. त्यामुळे सिडकोच्या डोक्यावर आपल्याला बसावे लागेल. सर्वांनी यासाठी जागरूक राहा. हे युद्ध आहे, पावसात भिजलो हे सांगून चालणार नाही. आपल्याला आता आरपारची लढाई करायची आहे. जे सिडकोचे अधिकारी जाणीवपूर्वक ग्रामस्थ आणि कॉलनीमधील रहिवाशांमध्ये संभ्रम निर्माण करून वाद लावण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याचा जाब आपल्याला लवकरच विचारायचा आहे. त्यामुळे येत्या काळात दोन्ही तालुक्यातील नागरिकांना एकत्रित घेऊन जसे दि.बा. पाटीलसाहेबांनी आंदोलन पेटवले होते तसेच आंदोलन आपल्याला करावे लागेल. (पान २ वर..)

## नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा
### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाने निर्माण झालेल्या परिस्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्यपूर्णरित्या आढावा घेत आहेत. या परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत तसेच ज्या ठिकाणी नुकसान झाले तेथे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, मुंबईत पुढील २४ तास विजांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या मुख्य सचिव तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध यंत्रणांना सतर्क आणि सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. एनडीआरएफ-एसडीआरएफ, अग्निशमन, महसूल प्रशासन तसेच गृह विभाग आदींना नियंत्रण कक्षांच्या माध्यमातून तातडीच्या उपाययोजना आणि मदत व बचावासाठीची सज्जता ठेवण्याच्या अनुषंगानेही त्यांनी विविध सूचना केल्या. जलसंपदा विभागाशी सातत्यपूर्ण समन्वय ठेवण्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत.

राज्याच्या मुख्य सचिव आणि राज्याच्या आपत्ती निवारण कक्षाशी मुख्यमंत्री सातत्याने संपर्कात आहेत व आवश्यक त्या सूचना देत आहेत.

## उरणमधील कळंबुसरेला वादळी पावसाचा तडाखा
### आमदार महेश बालदी यांच्याकडून पाहणी आणि मदत



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील कळंबुसरे गावात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक घरांचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच आमदार महेश बालदी यांनी सोमवारी (दि. २६) तातडीने गावात जाऊन नुकसानीची पाहणी केली. या वेळी त्यांनी गरजूंना तातडीची आर्थिक मदतही दिली.

आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीतून लोकांना पुन्हा उभे करण्यासाठी प्रशासन सज्ज असून उरणचे तहसीलदार उद्धव कदम आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना तातडीने मदत करण्याचे निर्देश आमदार बालदी यांनी दिले आहेत.

पाहणी व मदत देतेवेळी भाजपचे ज्येष्ठ नेते रवी भोईर, उरण ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जि.प. सदस्य जीवन गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, माजी सरपंच सुशील राऊत, माजी विभाग अध्यक्ष कुलदीप नाईक, रत्नाकर राऊत, अनंत गावंड, प्राचार्य रमाकांत गावंड, प्रवक्ते करण ठाकूर, उद्योजक देवेंद्र पाटील, रूपेश पाटील, राजेश पाटील, सुरेंद्र राऊत, विल्सन भोईर, प्रसाद पाटील, बाळ राऊत, बंडू घरत, सूरदास राऊत, संदेश पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आपत्तीच्या या काळात कोणीही एकटे नाही. शासन आणि प्रशासन तुमच्यासोबत आहे, असे आश्वासन आमदार बालदी यांनी नुकसानग्रस्तांना दिले.

## कर्जतमध्ये वीज पडून युवकाचा दुर्दैवी मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील बिरदोले येथील एका तरुणाचा सोमवारी (दि. २६) सकाळी वीज अंगावर पडून मृत्यू झाला. रोशन कचरू कालेकर (वय २७) असे मयत तरुणाचे नाव असून तो उल्हास नदीला आलेल्या पुरामध्ये शेतीचे नुकसान पाहण्यासाठी गेला असताना ही दुर्घटना घडली.

नेरळ-कळंब रस्त्यावरील बिरदोले गावाच्या मागील बाजूने उल्हास नदी वाहते. रात्री ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने उल्हास नदीला पूर आला. पुराच्या पाण्याने आपल्या शेतीचे किती नुकसान झाले आहे हे पाहण्यासाठी रोशन कालेकर हा तरुण सकाळी ७ वाजता घरातून बाहेर पडला होता. साडेसातच्या सुमारास रोशनच्या अंगावर वीज पडली आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. नेरळ पोलिसांनी मृतदेह नेरळ आरोग्य केंद्रात पाठवून दिला. शवविच्छेदनानंतर मृतात्म्यावर बिरदोले गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, शासनाने या तरुणाच्या कुटुंबाला आपत्कालीन मदत करावी, अशी मागणी नातेवाईकांकडून करण्यात आली आहे.



**पनवेल : आसामचे मंत्री चंद्र मोहन पटवारी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले नवीन पनवेल येथील दिलीप देसले यांच्या निवासस्थानी भेट देत कुटुंबियांचे सांत्वन केले. या वेळी त्यांनी महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली ४५ लाख रुपयांची मदत, आसाम सरकारकडून पाच लाख आणि आमदार प्रसाद लाड यांच्याकडून दोन लाख ५० हजार रुपयांच्या मदतीचा धनादेश देसले कुटुंबियांना सुपूर्द केला. सोबत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रांत अधिकारी पवन चांडक, तहसीलदार विजय पाटील, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, राकेश भुजबळ उपस्थित होते.**

## मे महिन्यातच वलगण; मत्स्यप्रेमींची चंगळ

**महाड : प्रतिनिधी**

जून महिन्यात पहिल्या पावसामध्ये नदी, नाल्यांमध्ये पाणी आल्यानंतर सुरू होणारी वलगण या वर्षी मे महिन्यातच अनुभवता आली आहे. यामुळे मासे खवय्यांची चंगळ झाली.



पावसाळा सुरू झाला की पहिल्या सरींमध्ये नदी, नाल्यांना पाणी येते. या पाण्याबरोबर अंडी सोडण्यासाठी मासेदेखील मिळेल त्या वाटेने बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. हीच संधी साधून त्यांना पकडण्यासाठी मत्स्य खवय्ये नदीकिनारी, शेतामध्ये जिथे जिथे पाणी भरून येते त्या त्या ठिकाणी धाव घेतात. हे चित्र संपूर्ण कोकणामध्ये प्रामुख्याने दिसून येते.

या माशांना वलगण किंवा चढणीचे मासे असे म्हटले जाते. जून महिन्यातली ही मेजवानी मे महिन्यातच आल्याने मत्स्य खवय्यांमध्ये आनंद पसरला. हातामध्ये पाग (मासे मारण्याचे जाळे) घेऊन ही मंडळी मासे पकडण्यास निघाली.




# कोकण रेल्वे भारतीय रेल्वेत विलीनीकरणास मान्यता

**माणगाव : बातमीदार**

कोकण रेल्वेचे विलीनीकरण आता भारतीय रेल्वेत करावी अशी जोरदार मागणी रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे यांनी लोकसभेत केली होती. त्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी मंजुरी दिली होती. या प्रस्तावाला केंद्र सरकारने कोकण रेल्वे विलीनीकरणास अंतिमतः मान्यता मिळाल्यामुळे कोकणातील विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे प्रवाशांसह कोकण रेल्वेचे आधुनिकीकरण होण्यासाठी मदत होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे कोकणचा कायापालट होण्यासाठी मोठी मदत होणार आहे.



कोकण रेल्वेचं भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण करण्याचा निर्णय आता अधिकृतपणे मंजूर झाला आहे. महाराष्ट्र सरकारने मार्च २०२५ मध्ये या विलिनीकरणासाठी आपली संमती दिली असून, केंद्र सरकारनेही त्याला मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे कोकण रेल्वे आता भारतीय रेल्वेच्या अधिकृत भाग म्हणून कार्यरत होईल, मात्र कोकण रेल्वे हे नाव कायम ठेवण्यात येणार आहे .

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड ही एक स्वतंत्र सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी होती, ज्यामध्ये केंद्र सरकारसह महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळ या राज्यांचा सहभाग होता. मात्र, निधीअभावी महत्त्वपूर्ण पायाभूत प्रकल्प जसे की ट्रॅक दुपदरीकरण, भूस्खलन प्रतिबंधक उपाययोजना आणि स्थानकांचे आधुनिकीकरण यामध्ये अडचणी येत होत्या.

कोकण रेल्वेचं भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण हे केवळ प्रशासकीय बदल नाही, तर कोकणाच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यटन विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या निर्णयामुळे कोकणातील लोकांना अधिक चांगल्या रेल्वे सेवा मिळतील आणि या प्रदेशाचा सर्वांगीण विकास साधता येईल.

भारतीय रेल्वेच्या निधीचा वापर करून ट्रॅक दुपदरीकरण, स्थानकांचे आधुनिकीकरण आणि सुरक्षा उपाययोजना राबविण्यात येतील. उत्तम रेल्वे सेवा आणि कनेक्टिव्हिटीमुळे कोकणातील पर्यटन आणि स्थानिक व्यवसायांना चालना मिळेल.नवीन प्रकल्प आणि सेवांमुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी वाढतील.

यामुळे कोकण रेल्वे सेवा अधिक सक्षम आणि प्रभावी होण्याची अपेक्षा आहे. याामुळे कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांना अधिक सुविधा, आणि एकसंध तिकीट प्रणालीचा लाभ मिळेल.

## अवकाळी पावसाचा हाहाकार; महाड-रायगड मार्ग पुन्हा बंद

**महाड: प्रतिनिधी**

महाड तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे . घाटात डोंगरावरून आलेल्या पाण्याचा मोठा प्रवाहामुळे रस्ता खचल्याने या मार्गावरील वाहतूक बंद झाल आहे .

अवकाळी पावसामुळे महाड तालुक्यातील सावित्री, गांधारी, काळ या तिन्ही नद्यांना आजूबाजूचे पाणी जाऊन मिळाल्याने नदी नाल्यातून पाणी वाहू लागले आहे. भात जमिनी मध्ये देखील पावसाच पाणी साचून राहिल्याने पेरणीची कामे खोळंबली आहेत. अवकाळी पावसाचा जोरदार फटका तालुक्यात बसला असून शेतकऱ्यांना शेती व्यतिरिक्त पूरक शेती आणि फळ उत्पादनावर फटका बसला आहे. रानमेवा असलेली काळी करवंद, आळू, ही फळे देखील खाता आली नाहीत.



तालुक्यातील सर्वच विकास कामे ठप्प झाली आहेत. महाड रायगड मार्ग या अवकाळी पावसामुळे बंद करावा लागला आहे. कोंझर घाटामध्ये धबधबा असलेल्या ठिकाणी काढण्यात आलेला पर्याय मार्ग पाण्याच्या झोतामुळे खचला गेला. यामुळे दोन्ही दिशेकडून होणारी वाहतूक थांबवण्यात आली आहे. दिवसभर पाऊस असला तरी मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी यंत्रणा कामाला लागली आहे.

महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याचे काम देखील अपूर्ण असल्याने या ठिकाणी देखील पाणी साचले आहे. हीच अवस्था मुंबई गोवा महामार्गावर देखील अनेक ठिकाणी आहे. महाड पंढरपूर भोर मार्गावर देखील मोठ्या प्रमाणावर चिखलाचे साम्राज्य तयार झाल्याने वाहत चालकांना वाहन चालवणे कठीण होऊन बसले आहे.

## ‘निढळ–ग्रामविकासाचा दळवी पॅटर्न’ पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे : रामप्रहर वृत्त**

प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या दुःखाचा शोध घेऊन त्याच्या निवारणासाठी काम केले पाहिजे. हेच काम चंद्रकांत दळवी यांनी केले आहे. यातूनच निढळ ग्रामविकाचा पॅटर्न तयार झाला आहे. हा पॅटर्न देशपातळीवर यशस्वी होईल, असा विश्वास ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमावेळी पुण्यात व्यक्त केले.




सत्व फाऊंडेशनच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या आणि सुनील चव्हाण लिखित निढळ – ग्रामविकासाचा दळवी पॅटर्न या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात रविवारी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात संपन्न झाला. या कार्यक्रमाला सह्याद्री फार्मचे अध्यक्ष विलास शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, राजेंद्र शिंदे, विराज शिंदे, विकास देशमुख, मीना जगदाने, धर्मेंद्र पवार, सुनील जोशी यांच्यासह विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमात एस.बी. प्रोडक्शन, पुणे निर्मित आणि शंकर बारवे दिग्दर्शित मनिढळ गाव : परिवर्तनाचा प्रवास माहितीपट टीझर मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, ग्रामीण विकासाचा दळवी पॅटर्न समाजाला मार्गदर्शक ठरू शकतो. दळवी साहेबांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी अनेक वर्षाच्या प्रवासात सातत्याने काम करून स्वतंत्र स्वरूपाचे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय क्षेत्रात काम करत असताना त्यांनी अनेक ग्रामविकास योजना प्रभावीपणे राबवून दुष्काळग्रस्त प्रदेशातील निढळ या गावाला नंदनवन करण्याचे काम केले असल्याचे गौरवोद्गार काढले.


तर चंद्रकांत दळवी म्हणाले की, आजही ७० टक्के जनता खेड्यात राहाते. शहरी भारत झपाट्याने विकसित होत आहे. मात्र खेडी विकसित होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## पावसात वीज यंत्रणेपासून सतर्क राहण्याचे महावितरणचे आवाहन

**कल्याण : प्रतिनिधी**

वादळी व संततधार पाऊस किंवा अतिवृष्टी, पूर परिस्थिती, झाडे व फांद्या कोसळल्याने तुटलेल्या वीजतारा, विजेची उपकरणे किंवा यंत्रणेमधील शॉर्टसर्कीट आदींमुळे वीज अपघाताची शक्यता असते. या पार्श्वभूमिवर नागरिकांनी सार्वजनिक व घरगुती वीजयंत्रणा, उपकरणांपासून सतर्क राहावे. तसेच पूर किंवा अतिवृष्टीमुळे धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्रांचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात येतो. अशा स्थितीत ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

कल्याण परिमंडलांतर्गत सर्वच मंडल कार्यालयांमध्ये चोवीस तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर आपत्कालीन परिस्थितीत साधनसामग्री व मनुष्यबळासह सज्ज राहण्याचे निर्देश मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी दिले आहेत. अतिवृष्टी, वादळी पाऊस आदींमुळे तुटलेल्या वीजतारा, वीजखांब, रस्त्याच्या बाजूचे फिडर पिलर, रोहित्रांचे लोखंडी कुंपण, फ्यूज बॉक्स तसेच घरातील ओलसर विद्युत उपकरणे, शेतीपंपाचा स्वीचबोर्ड, विद्युत यंत्रणेजवळील इतर ओलसर वस्तु, साहित्य आदींमुळे विद्युत अपघात होण्याची शक्यता असते.



पाणी हे विजेचे वाहक असल्याने पावसाळ्यात विद्युत उपकरणांचा पाण्यापासून बचाव करणे आवश्यक असते. मुसळधार पाऊस व जोराचा वारा यामुळे झाडे व फांद्या वीजतारांवर पडतात. यामध्ये वीजखांब वाकतात, वीजतारा तुटतात किंवा लोंबकळत राहतात. अशा वीजतारांमध्ये वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने, त्यापासून सावध राहावे. असे प्रकार आढळल्यास तातडीने महावितरणशी संपर्क साधावा.

## झाडाने अडवली मुंबई-पुणे जुन्या महामार्गाची वाट

**खालापूर,चौक: प्रतिनिधी**

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर वावंढळ गावच्या हद्दीत असलेल्या वावंढळवाडी पुला जवळ एक भलेमोठे आंब्याचे झाड पडून खोपोली पनवेल आणि पनवेल खोपोली या दोन्ही दिशांच्या मार्गावर तीन तीन किमी. लांबीच्या रांगा लागून वाहतूक कोंडी झाली होती.



पनवेल खोपोली रस्त्यावर वावंढळ वाडी पुलाजवळ एक आंब्याचे झाड पडून दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी झाली होती. हे झाड पडत असताना एक एस.टी.क्षणभर अगोदर निघून गेली ,दैव बलवत्तर म्हणून ती वाचली, बघता बघता दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी झाली, त्यामुळे पोलीस, ट्रॅफिक पोलिस यांना येण्यास अडथळा निर्माण झालापरिस्थितीचे गांभीर्य ओळखून रामदास काईनकर यांनी त्यांच्या मालकीची जेसीबी बोलावली, आणि झाडाच्या फांद्या तोडण्यास सुरुवात केली.

दोन तासांच्या अथक प्रयत्नाने रस्ता मोकळा झाला, पण बेशिस्त वाहन चालकांमुळे वाहतूक सुरळीत करण्यास पोलिसांना अर्धा तास गेला. दोन तासा नंतर आय आर बी यांची यंत्रणा दाखल झाली, वाहतूक कोंडीचा फटका बसला, त्यामुळे येण्यास उशीर झाला असे त्यांनी सांगितले.

## आंबेनळी घाटातील रस्ता रूंदीकरणावर झाडे कोसळली; एकेरी वाहतूक सुरू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पावसाने रात्रभर झोड उठविल्याने सोमवारी सकाळी पोलादपूर तहसिल कार्यालयातील आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये चोवीस तासांत पावसाची ९४ मि.मी.नोंद झाल्याची माहिती प्राप्त झाली. रविवारी दिवसभरामध्ये दोन घरांचे नुकसान झाल्याचे तसेच तालुक्यातील पोलादपूर महाबळेश्वर वाई रस्त्यावर सुरू असलेल्या रस्तारूंदीकरणावर झाडं कोसळल्याच्या घटना झाल्यामुळे एकेरी वाहतूक सुरू ठेवण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर, कापडे बुद्रुक, आड–चांभारगणी, किनेश्वर, पायटे, कुंभळवणे, कापडे खुर्द, दाभिळ आदी ८ गावांमध्ये पसरलेला आहेत. या रूंदीकरणामध्ये लालसर माती आणि मुरूम यांचा समावेश आहे. रुंदीकरणाच्या कामासाठी डोंगर–टेकडयांचे उभे उतारपट्टे कापले जात असून काही ठिकाणी साईडपट्टीवरही उत्खनन करून आंबेनळीतील घाटरस्ता असुरक्षित करण्यात आला आहे.

रविवारी वादळी पावसामुळे पळचिल गोलदरा येथील रमेश राजाराम शेलार यांची घराची भिंत कोसळली असून कुडपण येथील मंगल पांडुरंग चिकणे यांच्या घराच्या बाजूची संरक्षक भिंत कोसळले असून पडवीचे पत्रे उडाले आहेत.

### दुखवटा

## यमुना पाटील



**पनवेल :** भाजपचे कोपर (गव्हाण) ज्येष्ठ नेते वसंत पाटील यांच्या पत्नी यमुना पाटील यांचे वयाच्या ७७व्या वर्षी रविवार दिनांक २५ मे रोजी आकस्मिक रुग्णालयात निधन झाले आहे. त्यांच्यावर सोमवार दिनांक २६ मे रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

पान १ वरुन

## रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपले

पेण–खोपोली मार्गावर पहाटेच्या सुमारास साजगाव येथे रस्त्यात मोठे झाड कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. खोपोली नगर परिषद अग्निशमन विभाग आणि हेल्प फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी मेहनत घेऊन झाड कापून बाजूला करण्याचे प्रयत्न सुरू केले.

मुरूड शहरात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहराच्या दत्त मंदिर परिसरात झालेल्या अनधिकृत बांधकामांमुळे पावसाळी पाण्याचे नैसर्गिक मार्ग बदलले आणि पाण्याचा प्रवाह पायरी मार्गाने खाली उतरला. यामुळे रस्त्यावर पाणी साचले. अनेकांच्या घरात देखील पाणी शिरून नुकसान झाले. दत्त मंदिर परिसरात डोंगर फोडून भराव करण्यात आला आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने पहिल्यांदाच ही वेळ ओढवल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

अलिबाग तालुक्यातील बेलोशी–महाजने रस्ता पाण्याखाली गेला. त्यामुळे काही काळ या गावाचा संपर्क तुटला होता. श्रीवर्धन नगर परिषद हद्दीतील शंकर माळी यांच्या घराच्या मागची दरड कोसळायला सुरुवात झाली आहे. अभिषेक बोले यांच्या घराला धोका निर्माण झाला आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ–कळंब मार्गावरील पुलावरून पाण्यामुळे वाहतूक बंद झाली. म्हसळा–श्रीवर्धन मार्ग पाण्याखाली बुडाल्याने वाहतूक ठप्प झाली. पेण तालुक्यातील सापोली–हेटवणेमार्गे गोंदाव फाट्याकडे येणाऱ्या रस्त्यावरील मोरी खचल्यामुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली.

## कोपर स्मशानभूमी कारवाईला जनआंदोलनातून प्रखर विरोध

केंद्र आणि राज्य सरकार जनतेच्या हिताचे काम करीत आहे, पण हे सिडकोचे अधिकारी दिखावेगिरी करण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे आमचा लढा कायम राहणार आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिडकोला ठणकावून सांगितले.

जनआंदोलनाचा भडका बघता या वेळी पोलीस प्रशासनाने मध्यस्थी केली. त्या अनुषंगाने सिडकोच्या अधिकाऱ्यांसोबत उलवे पोलीस ठाण्यात बैठक झाली. या बैठकीला लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. नेऊल, सिडकोचे अधिकारी भरत ठाकूर आदींसह आंदोलकही उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तोडक कारवाई करण्यासाठी आलेल्या सिडको अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. स्मशानभूमी पूर्वापार आणि दोनशे वर्षांचा इतिहास असलेली आहे. विशेष म्हणजे ती सिडकोची नसून ग्रामपंचायतीची आहे. सिडकोने ग्रामपंचायतीला कोणत्याही प्रकारची सूचना दिली नाही. त्यामुळे काही सोसायट्यांच्या तक्रारीमुळे ही कारवाई करण्याचा प्रयत्न सिडकोकडून करण्यात येत होता. या कारवाईच्या अनुषंगाने सिडको आणि त्यांच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेबद्दल संशयाचा धूर पसरला आहे. त्यामुळे पिढ्यान् पिढ्या हयात गेलेल्या येथील ग्रामस्थ आंदोलकांनी सिडको आणि सिडकोचे अधिकारी भरत ठाकूर यांचा घोषणाबाजी करीत तीव्र शब्दात निषेध केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना म्हटले की, लोकनेते दि.बा. पाटील, जनार्दन भगतसाहेब, लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी लढे, आंदोलने उभारली गेली. सिडकोने स्वतःहून गावांना काही दिले नाही. लढा आणि सततचा पाठपुरावा करायला लागतो तेव्हा एखाद्या विषयात सिडको प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मनावर घेते. सुविधा देण्याचे लांब, पण ग्रामस्थांच्या हक्कांना छेद देण्याचे काम सिडको करीत आली आहे. या स्मशानभूमीला दोनशेपेक्षा जास्त वर्षे झाली असताना चार सोसायट्यांनी न्यायालयात तक्रार केली आणि सिडकोच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयात ग्रामस्थांची योग्य बाजू न मांडता चुकीची माहिती देऊन न्यायालयाची दिशाभूल केली आहे. त्यामुळे न्यायालयाने आदेश दिले असे असले तरी सिडकोने पुन्हा या विषयी ग्रामस्थांच्या भावना मांडल्या पाहिजेत, असे सांगत पिढ्यान् पिढ्या अस्तित्वात असलेली स्मशानभूमी तोडून हा भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा निषेध करू तेवढा कमी आहे.

न्यायालयाच्या आदेश आहे. मग ते आदेश काय आहेत याची ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांना माहिती दिली का? तसेच तोडक कारवाईची कालमर्यादा निश्चित नसताना व ही स्मशानभूमी सिडकोच्या मालकीची नसताना सिडको का कारवाई करायला आली? तशी सूचना प्रथम ग्रामपंचायतीला का दिली नाही? सिडको ही स्मशानभूमी तोडण्यासाठी का हातघाई करत आहे, असे प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विचारले असता आणि तोडक कारवाईवर जाब विचारला असता अधिकारी भरत ठाकूर निरूत्तर झाले. भरत ठाकूर यांच्याशी कोणतीही चर्चा करण्यात आम्हाला स्वारस्य नाही, कारण हे सिडकोचे अधिकारी चर्चेच्या लायकीचे नाहीत. त्यामुळे आमची चर्चा फक्त सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांसोबतच होईल, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठणकावून सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना संपर्क करून एमडींसोबत बैठक घेण्याचे आश्वासित केल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

या आंदोलनात ज्येष्ठ नेते पांडुमामा घरत, सी.एल. ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र घरत, गव्हाणच्या माजी सरपंच माई भोईर, विभागीय अध्यक्ष विजय घरत, माजी उपसरपंच सचिन घरत, जयवंत देशमुख, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, शैलेश भगत, निलेश खारकर, सचिन म्हात्रे, किशोर पाटील, अरुणशेठ ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### गावाच्या हितासाठी आंदोलकांचा प्रण

दरम्यान, कोपर येथील ज्येष्ठ नागरिक वसंत पाटील यांच्या पत्नी यमुना यांचे रविवारी निधन झाले आणि सोमवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर त्याच स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार होते. गावावर शोककळा पसरली असताना सिडकोचे अधिकारी भरत ठाकूर हे पथक घेऊन या स्मशानभूमीच्या तोडक कारवाईसाठी पहाटेच आले. याद्वारे सिडकोने निर्लज्जपणाचा कळस करीत मग्रुरी करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह ग्रामस्थांनी स्मशानभूमीत ठिय्या मांडला. एका बाजूला पार्थिवावर अंत्यसंस्कार होत होते, तर दुसरीकडे सिडकोबद्दल तीव्र संताप व्यक्त होत होता. घरातील व्यक्ती मयत झाला तरी या वेळी दुःख बाजूला करून स्मशानभूमी आणि गावाच्या हितासाठी आंदोलकांनी प्रण केला. काहीही होवो, पण स्मशानभूमीवर तोडक कारवाई करून देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. यामध्ये महिलांचीही उपस्थिती लक्षणीय होती.

### सिडकोने केली न्यायालयाची दिशाभूल

कोपर येथील स्मशानभूमी २०० वर्षांहून जुनी आहे. ग्रामपंचायत हद्दीतील ही स्मशानभूमी असून पिढ्यान् पिढ्या ग्रामस्थ या स्मशानभूमीचा अंत्यसंस्कारासाठी उपयोग करतात. विशेषतः यावर सिडकोची मालकी नाही, मात्र हा भूखंड सिडकोला गिळंकृत करायचा आहे. म्हणूनच कोणतीही सखोल माहिती न घेता काही लोकांच्या तक्रारीवरून सिडकोने कोणतीही अधिकृत माहिती न देता न्यायालयाची दिशाभूल केली आहे. या ठिकाणी म्हणजे भूखंड क्र.१७६, सेक्टर ९ उलवे नोड येथे कार्यकारी अभियंता उलवे–२ यांच्या १४ सप्टेंबर २०२० पत्रानुसार या स्मशानभूमीचे काम करण्याकरिता अधिकृतरित्या निविदा काढून काम देण्यात आले होते. तसा उल्लेखही सोसायट्यांच्या तक्रारीमध्ये आहे. अधिकृतरित्या स्मशानभूमीकरिता निविदा काढलेली जागा अचानकपणे अनधिकृत कशी ठरली असा प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे. याबाबत सोसायटी तसेच सिडकोमार्फतदेखील मुंबई उच्च न्यायालयाची दिशाभूल करण्यात आली आहे तसेच वर्षानुवर्षे ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत व अधिपत्याखाली स्मशानभूमी येते ती जागा ताब्यात घेण्यापूर्वी अथवा तेथील स्मशानभूमी स्थलांतरीत करावयाची असल्यास सिडको प्रशासनाला त्या ग्रामपंचायतीशी अथवा तेथील ग्रामस्थांशी चर्चा करावयाची किंवा पत्रव्यवहार करण्याची अजिबात आवश्यकता वाटली नाही हे अत्यंत आश्चर्यकारक आहे. सिडकोने स्मशानभूमी परस्पररित्या स्थलांतरीत करण्याचा निर्णय हा लोकशाही मूल्यांना धरून नसून प्रकल्पग्रस्तांच्या धार्मिक, सामाजिक व भावनिक भावना पायदळी तुडवणारा असल्याची चर्चा येथे सुरू होती.

# उरण पूर्व विभागाला अतिवृष्टीचा तडाखा

## ६० ते ७० घरांच्या छपरांसह जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान





**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पूर्व विभागात काल पहाटे ५:३० ते ६ वाजताचेदरम्यान ढगांचा गडगडाट विजांच्या कडकडाटासह चक्री वादळी पावसाने झोडापले असून, ठिकठिकाणी घरांच्या छपरांचे पत्रे व कौले उडून अतोनात नुकसान झाले आहे. मान्सून पूर्व पावसाच्या या चक्री वादळाच्या तडक्याने अनेक वृक्षे उनमळून पडली आहेत. तर काहींच्या वाहनांवर झाडे कोसळून वाहनांचेदेखील मोठे नुकसान झाले आहे.

अचानक झालेल्या या अतिवृष्टीने साऱ्यांची दाणादाण उडविली असून, गाव खेड्यातील सामान्य नागरिकांच्या घरावरील छप्परे उडाल्याने त्यांचे जनजीवन विसखळीत झाले आहे. त्यातच घरांच्या छप्परांचे पत्रे दोन–चार दिवसांत उपलब्ध करता येतील मात्र जुन्या असलेली मंगलोरी कौले सध्या बाजारपेठ विक्रीसाठी उपलब्ध नसल्याने यंदाचा पावसात घराचे पावसापासून संरक्षण करण्यासाठी मोठे संकट उभे ठाकले आहे. महागाईच्या नोकरी धंदा नसलेल्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात तारांबळ उडाली आहे.

उरण तालुक्यातील प्रामुख्याने कळंबूसरे चिरनेर, सारडे, वशेणी गावांना या चक्रीवादळाचा तडका बसला आहे. या पैकी कळंबूसरे गावातील सुमारे ६० ते ७० घरांची छप्परे उडाली आहेत. त्यातच पावसाचे पाणी घरांना जाऊन जीवनावश्यक वस्तूंचे अतोनात नुकसान झाले आहे. याशिवाय पावसाचा जोर सायंकाळपर्यंत कायम असल्याने नागरिकांनी जायचे कुठे? आणि राहायचे कुठे? असा प्रश्न सामान्य नागरिक, महिला आणि वयोवृद्धांना निर्माण झाला होता.

कळंबूसरे गावातील चक्री वादळाच्या तडक्यात नुकसान झालेल्या घरांची पाहणीसाठी उरण तहसीलदारांनी मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांची फौज पाठविण्यात आली होती. जागोजागी जाऊन सबधित अधिकाऱ्यांनी पाहणी केली, मात्र नुकसानीचे पंचनामे दोन दिवसांत करणार असल्याचे उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पनवेल परिसरात मुसळधार पाऊस; जनजीवन विस्कळीत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात रविवारी रात्रीपासून सोमवारी (दि.२६) दुपारपर्यंत ढगांचा गडगडाट व विजेच्या लखलखाटासह पडणाऱ्या पहिल्या मुसळधार पावसाने तारांबळ उडाली.

सततच्या पावसामुळे पनवेल शहरासह कळंबोली, खारघर, कामोठे, करंजाडे आदी परिसररात पावसाचे पाणी बैठ्या वसाहतींमध्ये शिरल्याने रहिवाशांची तारांबळ उडाली. सोमवारी पहाटेपासून विजेच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटांमध्ये मोसमी पावसाने जोरदार बरसण्याची सुरुवात केली. त्यामुळे पनवेलसह इतर भागातील सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली. शहरातील वाल्मिकी नगर येथेसुद्धा अनेक बैठ्या घरांमध्ये पाणी शिरल्याने तेथील रहिवाशांचे चांगलेच हाल झाले.

शहरासोबतच रेल्वे स्टेशन परिसरातही विकासकामे सुरू असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबले होते. त्यामुळे कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांना या तुंबलेल्या पाण्यातून मार्ग काढत स्टेशनपर्यंत पोहचावे लागले. ग्रामीण भागातसुद्धा हीच अवस्था बघायला मिळत असून ऐन मे महिन्यात अशा प्रकारच्या पावसामुळे धुमाकुळ घातल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.





**रसायनी : मुसळधार पावसामुळे आपटा येथे गटाराचे पाणी रस्त्यावर आले आहे. त्यामुळे घाण पसरली असून दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. आपटा गावातील एक मोठे तळे साफसफाईसाठी खोदून ठेवले होते, पण त्याचे काम अर्धवट केल्यामुळे पहिल्याच पावसामुळे त्या तळ्याची दुरवस्था समोर आली आहे. हे तळे नीट केले पाहिजे व या ठिकाणी तातडीने तेथे बंधारा बांधला पाहिजे तसेच तळ्यातील पाण वनस्पतीची काढण्यात यावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)

# पाणी साचलेल्या ठिकाणांची भाजपकडून दखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरात सोमवारी सकाळी झालेल्या जोरदार पावसामुळे शहरातील अनेक सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले. मिरची गल्ली, युनियन हॉटेल समोर, बीबी बांठिया ज्वेलर्स समोर, छत्रपती शिवाजी सर्कल येथील कल्याण ज्वेलर्स समोरील रस्ता आणि पंचरत्न सर्कल यांसारख्या प्रमुख ठिकाणी पाणी साचल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागला. या परिस्थितीची माहिती मिळताच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी तातडीने दखल घेतली.




परेश ठाकूर यांनी भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव यांना या संदर्भात माहिती देऊन त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, सुमित झुंझारराव यांनी तातडीने पाणी साचलेल्या ठिकाणी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला आणि त्यांची गैरसोय जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी जिल्हा सरचिटणीस माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्यामार्फत पनवेल महानगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधला. या त्वरित महानगरपालिकेचे कर्मचारी आणि पोकलेन मशीनच्या मदतीने तातडीने नालेसफाई करण्यात आली. साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारांवरील झाकणे उघडण्यात आली आणि पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करण्यात आली.

या कार्यवाहीत महापालिकेच्या वतीने महेंद्र भोईर आणि त्यांची आपत्कालीन टीम सक्रियपणे कार्यरत होती. लोकप्रतिनिधींच्या तातडीच्या भूमिकेमुळे पनवेल शहरातील पाणी साचण्याची समस्या लवकर नियंत्रणात आली.

# पनवेलमध्ये कोरोनाचे तीन संशयित रुग्ण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये कोरोनाचे तीन संशयीत रुग्ण आढळल्याने पालिका प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन विविध तीन रुग्णालयांमध्ये दोनशे खाटांचे विलगीकरण कक्ष उभारण्याची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली. तसेच रविवारी (दि.२५) झालेल्या बैठकीत पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व संबंधित यंत्रणांनी सज्ज राहण्याचे आदेश महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले. या वेळी पालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते आणि आरोग्य व स्वच्छता विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



रोडपालीमध्ये एक आणि खारघर उपनगरामध्ये राहणारे दोन असे तीन रुग्ण कोरोना साथरोगाचे आढळले असून तीनही रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली. रोडपाली येथील सेक्टर १७ मध्ये राहणाऱ्या ५९ वर्षीय महिला संशयीत कोरोनाचे रुग्ण आढळले असून त्यांच्यावर अपोलो रुग्णालयात उपचार सुरू आहे तसेच खारघरमधील सेक्टर ३ मध्ये ५१ वर्षीय महिलेवर सीबीडी येथील एमजीएम रुग्णालयात आणि तीसरे रुग्ण खारघरमधील सेक्टर १४ येथे ७४ वर्षीय पुरुष असून त्यांच्यावर अपोलो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वाढत्या रुग्ण संख्येमुळे पालिका आयुक्त चितळे यांनी कोरोना साथरोगावर तातडीने नियंत्रण कक्ष सुरू करण्याचे आदेश दिले.

खारघर येथील वायएमटी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निमिशा रुग्णालयात १०० खाटांचे कोरोना साथरोग रुग्णासाठी विलगीकरण कक्ष तसेच कळंबोली येथील पालिकेच्या रुग्णालयात ३० प्राणवायू खाटा आणि ६ खाटांचे अतिदक्षता विभागाची तयारी करण्याचे काम पालिकेने हाती घेतल्याची माहिती दिली. याचसोबत तसेच पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात ५० खाटा आणि कामोठे येथील एमजीएम रुग्णालयामध्ये ५० खाटा आरक्षित ठेवण्याबाबतच्या सूचना पालिका आयुक्तांनी बैठकीत दिल्या.

आयुक्तांच्या सूचनेननुसार संबंधित रुग्णालय व्यवस्थापनासोबत पत्रव्यवहार करण्यात आल्याचे पालिकेच्या आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. पनवेल शहरातील पॅरामाऊंट रुग्णालयात इतर तालुक्यामधील एक रुग्ण कोरोना रोगावर उपचार घेत आहे. पालिकेच्या मोल एक्स्पर्ट या आरटीपीसीआर लॅबमध्ये दररोज दिडहजार आरटीपीसीआर चाचण्या करण्याची क्षमता असून या लॅबसाठी लागणारी आवश्यक रसायने पालिकेमध्ये उपलब्ध असल्याने ही लॅब पालिकेने सुरू केली आहे. पालिकेच्या आरोग्य विभागात सहाशेहून अधिक मनुष्यबळ असल्याने कोरोना रुग्णांची तपासणी पालिका करू शकेल.

# कळंबोली स्टील मार्केटसह पनवेल-मुंब्रा रस्त्यावर रोडपाली परिसरात वाहतूक कोंडी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वाहतूक शाखेच्या नियोजनशून्य कारभारामुळे पनवेल मुन्ना महामार्गावर रोडपाली परिसर आणि स्टील मार्केटमधील रस्त्यावर वाहने उभी केली जात असल्याने वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस उग्र रूप धारण करत आहे. पोलिसांचे भय नसल्याने स्टील मार्केट, कळंबोली, रोडपाली परिसरातील रस्त्यावर वाहने उभी केली जात आहेत. त्याचप्रमाणे पनवेल मुंब्रा रस्त्यावर सरास वाहने उभी असल्याने या रस्त्यावरील प्रवासी आणि नागरिक वाहतूक कोंडीने त्रस्त आहेत.



येथील लोखंड पोलाद मार्केट, आणि बाजूलाच असलेल्या तळोजा औद्योगिक वसाहतीत मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची ये–जा चालू असते. स्टील मार्केटमध्ये येणाऱ्या वाहनांना पार्क करता यावे म्हणून सिडकोच्या माध्यमातून पाच नंबरमध्ये वाहनतळ उभे करण्यात आले आहे, पण पार्किंगचे पैसे वाचविताना या मार्केट मध्ये येणारी वाहने रस्त्यावरच उभी केली जात आहेत. पोलिसांकडून पार्किंग चालविल्या जात आहेत. नाहीतर गाडी रस्त्यावर उभी करण्याची कोणी हिंमतच करू शकणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

त्याच बरोबर पनवेल सायन मार्गावरील मार्बल मार्केटजवळील टोल वाचविताना ही वाहने रोडपाली लिंकरोड मार्गाने पुणे गोव्याला जात असल्याने पनवेल मुंब्रा रस्तावर रोडपाली सिग्नलवर सततची प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे या रस्त्यावरून नागरिकांना प्रवास करणे नकोसे झाले आहे. चार वर्षांपूर्वी पनवेल–मुंब्रा रस्त्यावर नावडे गावाजवळ उड्डाण पूल उभारण्यात आला आहे. तो उड्डाण पुल कळंबोली उड्डाण पुलाला जोडण्यात आला असता तर रोडपाली सिग्नलवर चारही रस्त्यावर होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडी पासून नागरिकांच्या सुटका झाली असती. या रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी युद्ध पातळीवर उपाययोजना करा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# पांडवकडा धबधब्यात अडकलेल्यांची सुटका

## अग्निशमन दलाने पाच युवकांना वाचवले

**कळंबोली : बातमीदार, पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहती मधील सेक्टर ६, ड्रायव्हिंग रेंजच्या पाठीमागे असलेल्या डोंगरावर पांडवकडेच्या बाजूस असलेल्या छोट्या धबधब्याच्या साधारण ग्राऊंड लेवलपासून ६००ते ७०० मीटर आतमध्ये धबधब्याच्या खाली सायन कोळीवाडा येथील पाच तरुण अडकले होते. धबधब्याच्या पाण्याचा प्रवाह जोरात असल्याने त्यांना खाली येता येते नव्हते. अखेरीस याबद्दलची माहिती खारघरच्या अग्निशामकदलाला मिळतात अग्निशामक दल प्रमुख सौरभ पाटील यांच्या पथकाने या निर्जन स्थळी अडकलेल्या पाच व्यक्तींची सुखरूप सुटका करून खारघर पोलिसांच्या ताब्यात दिले आहेत.



नागरिकांनी पावसाळ्याच्या वेळी पाण्याचे प्रवाह नैसर्गिक साधन संपत्तीच्या ठिकाणी जाऊन आपला जीव धोक्यात न घालता संरक्षण करण्याचे आवाहन या वेळी अग्निशामक दल प्रमुख सौरभ पाटील यांनी नागरिकांना केले आहे. खारघरमधील प्रसिद्ध पांडवकाड्याच्या बाजूला असलेल्या छोट्याशा धबधब्यामध्ये पावसाळी सहली निमित्त निसर्गाचा आनंद घेण्यासाठी सायन कोळीवाडा येथील पाच तरुण व्यक्ती गेले होते, मात्र पावसाच्या पाण्याचा अंदाज न आल्याने ते धबधब्याच्या मागील बाजूस अडकले. जस जसे पाण्याचा प्रवाह वाढत गेला तसतशी त्यांच्या जीवाची घालमेल होऊ लागली. अखेरीस त्यांनी खारघर अग्निशामक दलाशी संपर्क साधून मदत करण्याचे आव्हान केले. त्यानुसार खारघर अग्निशामक दलातील प्रमुख सौरभ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी जाऊन रस्सीच्या साहाय्याने त्या पाच व्यक्तींना धबधब्याच्या दुसऱ्या बाजूला काढून सुखरूप खाली घेऊन काढण्यात आले.

रेसक्यु केलेल्या व्यक्तींमध्ये महेश सुभाष शिरगड (वय २२), राकेश वेलमुर्गन (वय १८), प्रतिक जोग (वय १८), रमेश चिंगमेटे (वय१९), साहील शेख (वय २१, सर्व राहणार–सायन कोळीवाडा, डॉ. आंबेडकर चाळ, मुंबई) यांचा समावेश आहे. रेसक्यु केलेल्या सर्वांना खारघर पोलीस ठाण्याचे एपीआय प्रदीप आव्हाड यांच्या ताब्यात दिले आहे.

# उरण रेल्वेस्थानकावरील लिफ्टचे काम पूर्ण करण्याची मागणी

**उरण : बातमीदार**

उरण येथे नुकत्याच सुरू झालेल्या उरण–नेरूळ हार्बर रेल्वेला उतरती कळा लागल्याचे दिसून येत आहे. उरण येथील हार्बर रेल्वे स्टेशन करीता दोन लिफ्टचे काम अपूर्ण आहे. स्टेशनचे तिकीट बुकींगचे कार्यालयाचे पूर्वेकडील टॉयलेट सुरू असून पश्चिमे कडील टॉयलेट बंद आहे.

उरण स्टेशनवर लहान मुलांकरीता फिडिंग रूम अस्तित्वात नाही. तसेच स्टेशनची सफाई ४ ते ५ सफाई कामगारांमार्फत दुपारी संध्याकाली केले जाते. त्यामुळे प्रवाशांना धुळीचा सामना करावा लागतो. स्टेशनमध्ये भटक्या कुत्र्यांचा वावर असून सुरक्षा रक्षक यावर लक्ष देत नाहीत. रेल्वे स्टेशनवर कँटिंगची सुवीधा नसून रिक्षा व्यवस्था ही अपूरी असून गर्दीचे वेळी प्रवाशांच्या लांबच लांब रांगा पहावयास मिळतात. खरे पहाता, रेल्वेच्या नियमाप्रमाणे रेल्वे प्रत्येक स्थानकामध्ये ५ ते ६ सेकंद थांबण्याचा नियम असताना उरण रेल्वे स्थानका दरम्यान ३ ते ४ मिनिटे घेते. त्यामुळे प्रत्येक रेल्वे १० ते १५ मिनिटे उशीराने धावते. या प्रकाराने उरण येथील रेल्वे प्रवासी त्रस्त झाले आहेत. अपूर्ण काम लवकर पूर्ण करण्याची मागणी नागरिक करीत आहेत.



# मोकाट डुकरांचा खारघरमध्ये सुळसुळाट

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १६ मधील खेळाच्या मैदानात मोकाट डुकरांचा सुळसुळाट झाला आहे. डुकरांमुळे मुलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पालिकेने मोकाट डुकरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

खारघर सेक्टर १६ मधील रहिवासी आणि मुलांना विविध खेळ खेळता यावे, यासाठी सिडकोने मैदान उपलब्ध करून दिले आहे, मात्र गेल्या आठवडाभरापासून मैदानात मोकाट डुकरांचा सुळसुळाट झाला आहे. सकाळ–संध्याकाळ रानटी डुकरी मैदानाचा ताबा घेत असल्यामुळे लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मैदानापासून काही अंतरावर असलेल्या एसटीपी प्लॉटच्या मागील बाजूला वराह पालन केले जात आहे. डुकर थेट मैदानासह वसाहतीत सोडण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

# खारघरमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक व्यक्ती कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

इंद्रसिंग रामेश्वर चौधरी (३५ रा.खारघर) असे या व्यक्तीचे नाव असून, उंची पाच फुट ११ इंच, रंग सावळा, केस काळे, नाक सरळ असून, अंगात पिवळा शर्ट व जिन्स पॅन्ट घातली आहे. त्याला हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा हवालदार नितीन आखाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# पदार्पणातच कहर

राज्यात यंदा मोसमी पाऊस वेळेपूर्वीच दाखल झाला असून गेल्या तब्बल ६९ वर्षांच्या नोंदींनुसार मुंबईत यंदा सर्वात लवकर पाऊस दाखल झाला आहे. पहिल्याच दिवशी ढगफुटीसदृश पावसाने मुंबईसह राज्यातील अनेक भागांत दाणादाण उडवली. रायगड, पुणे, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यांमध्ये पावसाचे भयानक रूप पदार्पणातच पहायला मिळते आहे.

**राज्यातील अनेक भागांत सोमवारचा दिवस पावसाच्या रौद्ररूपासहच उजाडला. प्रादेशिक हवामान विभागाच्या माहितीनुसार मान्सूनने सोमवारी मुंबई, पुणे आणि सोलापूरसह राज्याच्या आणखी काही भागांत वाटचाल केली. रायगड जिल्ह्यालाही मुसळधार पावसाचा तडाखा बसला. जिल्ह्यातील मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची, चोवीस तासांत ३०० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली. जिल्ह्यातील सर्व नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे. मुंबईत रात्रभराच्या पावसानंतर सोमवारी सकाळपासूनच पावसाचा जोर वाढलेला दिसला व सगळीकडे अंधारून आले होते. मंत्रालय, चर्चगेट रेल्वेस्थानक परिसरात पावसाचे पाणीच पाणी साचले तर नव्या भूमिगत मेट्रोच्या काही स्थानकांमध्ये पाणी शिरल्याने त्याची दृश्ये समाजमाध्यमांवर सर्वाधिक पसरली. या मेट्रो प्रकल्पाचे काम अद्याप पूर्णत्वाला गेलेले नाही. संरक्षक भिंतींचे बांधकाम बाकी असताना अकस्मात पावसाचे दहा दिवस आधी आगमन झाल्याने ही गळती झाली असा खुलासा मेट्रोकडून करण्यात आला. पावसाळ्यातील हे अनुभव लक्षात घेऊन मेट्रोतील सुरक्षेच्या दृष्टीने वेळीच योग्य खबरदारी घ्यावी लागणार आहे. अर्थातच प्रशासनाकडून आवश्यक ती पावले उचलली जातीलच. सोमवारी अवघ्या एका तासात नरिमन पॉइंट परिसरात तब्बल १०४ मिमी पावसाची नोंद झाली. पावसाचे हे बदलेले स्वरूप सर्वत्र दिसते आहे. एव्हाना संपूर्ण केरळ व्यापून कनार्टक, गोवा व महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला आहे. बंगालच्या उपसागरात पुढील २४ तासांत कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. याचाच परिणाम म्हणून पुढील काही दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. येते तीन ते चार दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषत: मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर येथे अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. पुणे, सातारा या जिल्ह्यांमध्ये सतर्कतेचा आणि दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरातील प्रशासनाला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. सोबतच नागरिकांनीही सावध राहण्याची आणि काळजी घेण्याची गरज आहे. यावर्षी महाराष्ट्रात नैऋत्य मोसमी पावसाचे आगमन रविवारी २५ मे रोजी म्हणजे ५ जून या नेहमीच्या तारखेच्या दहा दिवस आधी झाले. कोल्हापूरला गेल्या पाच दिवसांपासून पावसाने झोडपले आहे तर गेल्या ५१ वर्षांत जेवढा पाऊस झाला नाही तेवढा पाऊस बारामतीत आता झाल्याचे सांगण्यात येते आहे. तीन दिवसांपासून अतिवृष्टीमुळे शेतांमध्ये पाणी घुसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कोकणातही गेल्या दोन दिवसांतील पावसामुळे शेतांमध्ये किमान गुडघाभर चिखलपाणी झाले आहे. मंगळवारसाठीही अतिवृष्टीचा इशारा असल्याने भातशेती करणारे शेतकरी धास्तावले आहेत. पावसाचा जोर कमी झाला, थोडे ऊन पडले तरच पेरणी नीट पार पडू शकणार आहे. मान्सून अकाली आला आहे. पुढील चार महिन्यात त्याचा रागरंग कसा राहतो यावर शेतीचे भवितव्य अवलंबून आहे.**

# शेतकरी आणि हवामान खाते दोघेही संभ्रमात





**खबरबात**
**महेश शिंदे**

मे महिन्यात सुरू असलेला पावसाळा पाहता निसर्गाचा हा चमत्कार यापूर्वी कधीच कोणी पाहिलेला नाही. १५ मे पासून विजांच्या गडगडाचा सह पावसाने हजेरी लावली यावेळी हा पाऊस पूर्व मोसमी पाऊस किंवा मृग नक्षत्राच्या सुरुवातीला पडणारा पाऊस म्हणून केवळ कुतूहलान त्याकडे पाहिलं गेलं. दरवर्षीप्रमाणे असह्य होणारा उकाडा या दोन दिवसाच्या पावसामुळे काहीसा कमी झाला आणि पुन्हा एकदा वातावरण निवळून शेतीच्या कामाला सुरुवात करू असा शेतकऱ्यांना विश्वास होता. मात्र त्यांचा या विश्वासाला निसर्गाच्या या कोपाने तडा गेला असून, १५ मे पासून सुरू झालेला हा पाऊस आजतागायत काही थांबायला तयार नाहीत.

नैऋत्य दिशेने येणाऱ्या मोसमी वाऱ्यांच्या प्रभावाने पूर्व मौसमी पाऊस पडला जातो. यामध्ये अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान हवेतील आद्रता व हवेचा दाब या गोष्टींचा प्रभाव या पूर्व मोसमी पावसावर होत असतो. काही दिवस पडल्यानंतर हा पाऊस थांबतो आणि पुन्हा मे महिन्यातील उन्हाचे चटके जाणवू लागतात. या पावसाने भिजल्यामुळे शेतातील माती थोडी हलकी व भुसभुशीत झाल्याने पूर्व मशागतीला ही चांगली समजली जाते. अशावेळी लगबगीने शेतकरी शेताची नांगरखी करून बांधबंधिस्ती करून २५ मे या तारखेची वाट बघतो. कारण २५ मे नंतर कोकणामध्ये बहुतांश भागात मृग नक्षत्राला सुरुवातीला पेरणी केली जाते. कोकणातील पेरणी ही बहुतांश धुळवाफ्याची पेरणी असते. यामध्ये ज्या जागी बियाणे पेरायचे आहे ती जागा भाजून करून खोडकिडावं इतर तणनाशक विरहित केली जाते. या जागेवरती पुन्हा नांगरकी करून वाफ्यावरती भात पेरणी केली जाते त्यानंतर या पेरणीवर फळी फीरवुन सपाटी करून तरव्याच्या रुजवणीला पोषक परिस्थिती निर्माण करून दिली जाते. आता वाट असते ही मृघल नक्षत्रातल्या पावसाची. कोकणामध्ये साधारणत सात जून नंतर मान्सूनच्या पावसाला सुरुवात होते त्यापूर्वी पडणाऱ्या मृग नक्षत्रातल्या पावसाने या तरव्यांना ओलावा मिळाल्याने हळुवारपणे भाताची रुजवून सुरू होते आणि मान्सून सुरू होण्यापर्यंत बियाण्याची चांगल्या पद्धतीने वाढ होऊन रोपांची चांगली जोपासणे केली जाते. पूर्ण जून महिन्यामध्ये पावसाची तीव्रता अधिक नसल्याने कोवळ्या रोपांना रुजवत होण्यासाठी पोषक वातावरण निर्मिती होते आणि जुलै महिन्यात पावसाची तीव्रता वाढल्याने शेतामध्ये पाणी साचून चिखली साठी अथवा लावणीसाठी पुन्हा शेतामध्ये नांगर की केली जाते. याच दरम्यान नदी नाल्यांना ओव्यांचा पाणी वाहू लागल्याने मोठ्या पाण्यातील मासे कमी पाण्याच्या प्रवाहाकडे अंडी देण्यासाठी येतात. यालाच आमच्याकडे वलगण लागणे किंवा चढणीचा मासे असे म्हणतात. अशावेळी नदी नाले ओढे किनारी व शेतामधून मासे पकडण्याचे जाळे पाग घेऊन ठिकठिकाणी लोक मासेमारी करण्याचे चित्र दिसत असते. जुलै महिन्याचे अखेरीस व ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला कोकणातील बहुतांश शेतीची लावणीची कामे पूर्ण होऊन शेतकरी गणरायाच्या आगमनाची वाट बघत असतो. गणरायाच्या आगमनाने गणपतीच्या उत्सवात कोकणातला शेतकरी आनंदी होऊन जातो.

मात्र २०२५ यावर्षी परिस्थिती विचीत्र झाली असून, मे च्या मध्यंतरापासूनच सुरू झालेल्या पावसामुळे शेतीच्या कामांना विलंब झाला आहे. बहुतांश शेतकऱ्यांची भाजवण देखील होणे बाकी आहे. अतिवृष्टी प्रमाणे कोसळणाऱ्या या पावसामुळे २५ मे हा पेरणीचा मुहूर्त देखील टळून गेला आहे. शेतकऱ्यांनी लगबगिने बाजारातून भात बियाणे संपू नये म्हणून अगोदरच खरेदी करून ठेवले आहे. कोकणातला शेतकरी जरी अल्पभूधारक असला तरी त्याला जवळपास चार ते पाच हजार रुपये किमतीचे भात बियाणे खरेदी करावी लागते व पूर्व मशालिकेपासून लावणी कापणी झोडणी या कामांसाठी शेतकऱ्याला एकरी जवळपास ५० हजार रुपये इतका खर्च होतो. कोकणातला शेतकरी या खर्चासाठी कधीच बँकांकडून शेती कर्ज घेत नाही. यावर्षी नफा मिळाला नाही तर कडधान्य किंवा बागायती आंब्यांमधून थोडाफार नफा मिळेल या आशेवरती कोकणातला शेतकरी दरवर्षी नित्य नियमाने सचोटीने व प्रामाणिकपणे शेती करत असतो. शेतीत झालेल्या नुकसानीने, पुराने, अवकाळी पावसाने भात भिजल्याने हा शेतकरी कधीच आत्महत्या करत नाही. सदैव प्रतिकूल परिस्थितीत शेती करून स्वाभिमानाने जगणाऱ्या या कोकणातल्या शेतकऱ्याने मे महिन्यामध्ये कोसळणाऱ्या या अतिवृष्टीमुळे यावर्षी उपासमारीची वेळ आली आहे हे नक्की.

मे महिन्यामध्येच अतिवृष्टी प्रमाणे कोसळणाऱ्या या पावसाची पूर्वकल्पना ना हवामान विभागाला मिळाली, ना कुठल्याही ज्योतिषाला मिळाली ? त्यामुळे अपेक्षित असल्याप्रमाणे हवामान विभागाकडून शेतकऱ्यांना या प्रकरणी माहिती अथवा ज्ञान प्राप्त झाले नसल्याने शेतकऱ्यावरती आज हे संकट कोसळले आहे. जर का हवामान विभागाने वातावरणातील या बदलाची पूर्व कल्पना अथवा सूचना शेतकऱ्याला दिली असती तर शेतकऱ्यांनी या संकटा अगोदरच जर का पेरणी केली असती तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती. आज या शेतकऱ्याच्या मदतीला ना हवामान विभाग, ना कोणतेही ज्योतिष शास्त्र, ना कोणता देव धावून येताना दिसत नाही. जर काय यावर्षी मे अखेरीस पर्यंत हा कोसळणारा पाऊस थांबला नाही. पंधरा-वीस दिवसाची उघडी दिली नाही तर यावर्षी पेरणी होणार नाही आणि भात शेती देखील होणार नाही अशा वेळेस मायबाप सरकार शेतकऱ्यांच्या मदतीला उभे राहिले नाही तर मात्र कोकणातला शेतकरी उद्वस्त होण्यापासून कोणीही वाचवू शकणार नाही. कोकणातल्या प्रत्येक विधानसभा मतदारसंघातल्या आमदार आणि खासदारांनी याबाबत तात्काळ बैठक बोलावून किंवा विशेष अधिवेशन बोलावून या आपत्कालीन परिस्थिती शेतकऱ्याला आणि शेतीला कसे वाचवता येईल याबाबत आत्ताच उपायोजना करण्याची गरज आहे शेतकऱ्याला तात्काळ शेती कर्ज देऊन त्यांच्या झालेल्या नुकसानीचा मोबदला द्यावा अशा प्रकारची मागणी जर होत असेल तर ती योग्यच आहे. शासन आणि प्रशासन यांनी एकत्र येऊन या नैसर्गिक संकटातून कोकणातील शेतकर्याला वाचवला हवे.



## बदलते तंत्रज्ञान

# 'लावा'चा स्वस्त ५जी स्मार्टफोन शार्क लाँच

भारतीय मोबाइल कंपनी लावा इंटरनॅशनलने २३ मे रोजी भारतात एक नवीन स्मार्टफोन लावा शार्क ५जी स्मार्टफोन लाँच केला आहे. कंपनीने ते ४ जीबी रॅम + ६४ जीबी स्टोअरेजच्या एकाच प्रकारात सादर केले आहे.




त्याची किंमत ७,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे.या मोबाईलची विक्री सुरू झाली आहे आणि कंपनी आपल्या वापरकर्त्यांना फोनसोबत १ वर्षाची मोफत सेवा होम वॉरंटी देत आहे. हा फोन स्टेलर गोल्ड आणि स्टेलर ब्लू रंगांमध्ये उपलब्ध आहे.

लावा शार्क ५जी:डिस्प्ले: लावा शार्क ५जी मध्ये १६१२ ÷ ७२० पिक्सेल रिझोल्यूशनसह ६.७५-इंचाचा एचडी+ स्क्रीन आहे. हा 'यू' आकाराचा वॉटरड्रॉप नॉच स्टाइल डिस्प्ले एलसीडी पॅनेलवर बनवला आहे आणि ९० हर्ट्झ रिफ्रेश रेटवर काम करतो.

कामगिरी: कामगिरीसाठी फोनमध्ये युनिसॉकचा T765 ऑक्टा-कोर प्रोसेसर आहे. हे 6Nा फॅब्रिकेशनवर बनवलेले मोबाइल उझण आहे. ग्राफिक्ससाठी, फोन माली-G57 MC2 GPU ला सपोर्ट करतो. हा फोन नवीनतम अँड्रॉइड १५ ऑपरेटिंग सिस्टमवर काम करतो.

मेमरी: मोबाईलमध्ये ४ जीबीची LPDDR4x फिजिकल रॅम आणि ४ जीबीची व्हर्च्युअल रॅम आहे. ६४ जीबी यूएफएस २.२ अंतर्गत स्टोरेज आहे जे मायक्रो एसडी कार्डद्वारे ५१२ जीबी पर्यंत वाढवता येते.

कॅमेरा: फोटोग्राफीसाठी, फोनच्या मागील पॅनलवर एलईडी फ्लॅशसह १३-मेगापिक्सेल एआय सेन्सर उपलब्ध आहे. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी ५ मेगापिक्सेलचा फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे.

बॅटरी: पॉवर बॅकअपसाठी, यात ५०००mah बॅटरी आहे. हे १८थ फास्ट चार्जिंग तंत्रज्ञानासह येते. वापरकर्त्याला फोन बॉक्समध्ये १० वॅटचा चार्जर मिळेल.

इतर वैशिष्ट्ये: मोबाईलमध्ये ड्युअल मोड ५जी बँड (५जी एसए/एनएसए) उपलब्ध आहेत. सुरक्षेसाठी, यात साइड माउंटेड फिंगरप्रिंट सेन्सर आहे. कनेक्टिव्हिटीसाठी, वायफाय, ब्लूटूथ ५.० आणि यूएसबी टाइप-सी उपलब्ध आहेत. या फोनला खझ५४ रेटिंग आहे जे वॉटर स्प्लॅशपासून सुरक्षित ठेवते.

# विकासपुरुष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



**निमित्त**

उत्कृष्ट कल्पना आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन असलेला द्रष्टा, निकाल मिळविण्यावर विश्वास ठेवणारा सक्षम प्रशासक, पक्ष कार्यकर्त्यांसाठी एक प्रतिष्ठित नेता, विरोधी पक्षात असताना सरकारला हाताशी धरणारा विरोधी पक्ष नेता आणि सत्तेवर असताना विकासपुरुष... नितीन गडकरी यांच्या व्यक्तिमत्त्वाला उत्तम प्रकारे आणणारे शब्द मंत्री म्हणून उत्कृष्ट कामगिरी करतात. दुसऱ्या शब्दांत, इथे लोकशाही घडवण्याची, वितरित करण्याची क्षमता असलेला नेता आहे! आज त्यांचा वाढदिवस.

एक अदम्य नितीन गडकरी ज्यांच्यासाठी राजकारण हे सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे साधन आहे ते केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग तसेच जहाजबांधणीमंत्री आहेत. गडकरी हे महाराष्ट्राच्या विदर्भातील नागपुरातून लोकसभेवर निवडून येतात. हा पूर्वी काँग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला, पण गडकरी यांनी सात वेळा विजेते विलास मुत्तेमवार यांचा सुमारे तीन लाख मतांच्या फरकाने पराभव केला.

वचनबद्ध अनुयायांमधून जागतिक दर्जाचे नेते घडवून इतिहास रचणाऱ्या स्व. भाऊराव देवरसांच्या स्मरणार्थ चारित्र्य, सामर्थ्य आणि कृतीची केंद्रित दिशा निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी नितीन गडकरी यांनी एक संस्था स्थापन करण्याचा विचार सुरू केला.

नितीन गडकरी यांचा जन्म २७ मे १९५७ रोजी महाराष्ट्रातील नागपूर शहरात एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला, जे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालयदेखील आहे. गडकरींच्या आईचा त्यांच्यावर खूप प्रभाव राहिला आणि त्यांनी त्यांच्यामध्ये सामाजिक कार्याची भावना रूजवली. समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी काम करण्याच्या नि:स्वार्थ प्रेरणेने आरएसएस आणि राष्ट्र उभारणीच्या मिशनद्वारे त्यांना त्यांच्या सुरुवातीच्या जीवनात प्रेरणा मिळाली.

जून १९७५मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी लादणे हा गडकरी यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट होता आणि त्यांनी कायद्याचा सराव करण्यापेक्षा देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला. गडकरी यांनी एमकॉम, एलएलबी आणि डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट (डीबीएम)चे शिक्षण घेतले आहे.

गडकरी यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे विद्यार्थी नेते म्हणून राजकारणात प्रवेश केला आणि नंतर भाजपची युवा शाखा असलेल्या जनता युवा मोर्चामध्ये सहभागी झाले. तो स्वत:ला करिअर राजकारणी मानत नाही, तर राजकारणाला समाजसेवा मानतात. गरीबांसाठी, समाजासाठी आणि दलितांसाठी प्रकल्प सुरू करतो.

गडकरी हे १९८९पासून महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य राहिले. १९९९-२००५पर्यंत ते महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेही होते. २००९पर्यंत त्यांनी महाराष्ट्र प्रदेश भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून नेतृत्व केले जेव्हा त्यांना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पदोन्नती करण्यात आली आणि ते पक्षाचे सर्वांत तरुण अध्यक्ष बनले.

गडकरी यांच्याकडे सशक्त भारताची दृष्टी आहे त्यांचे लक्ष नेहमीच कर्तृत्वावर असते. आज देशातील एक दूरदृष्टी असलेला नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा! (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# मसाला पापड खाणं आरोग्यासाठी कितपत योग्य

हॉटेलमध्ये गेल्यावर जेवणाआधी स्टार्टर म्हणून अनेकदा आपण मसाला पापड खाल्ला जातो. हा चविष्ट आणि चटकदार पापड लहानांपासून मोठ्यापर्यंत अनेक जण आवडीने खातात. मेटाबॉलिक हेल्थ कोच करण सरीन यांनी उडीद डाळीपासून बनवलेला पापड तळून, त्यावर कांदा, टोमॅटो, कोथिंबीर व मिरच्या टाकून तो खाल्ला. मसाला पापड खाल्ल्यानंतर दोन तासांनी त्यांना रक्तातील साखरेची वाढ दिसून आली नाही. हा पापड अत्यंत पातळ आहे आणि जोपर्यंत तुम्ही त्याचे जास्त प्रमाणात सेवन करीत नाही तोपर्यंत कार्बचा भार खूपच कमी असतो,पापड मर्यादित प्रमाणात खाल्ल्यास तो आरोग्यदायी असतो, ज्यामध्ये मधुमेहींचाही समावेश आहे. भाजलेले पापड तळलेल्या पापडांपेक्षा चांगले असले तरी ते दररोज खाऊ नयेत, पापड बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पिठामधील प्रथिने आणि फायबर फायदेशीर ठरू शकतात; परंतु सोडियमचे जास्त प्रमाण किंवा जास्त तळलेला पापड खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.



मसाला पापडात कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण खूप कमी असू शकते. त्यात मैद्याचे पीठ असले तरी, साखरेचे प्रमाण फारसे जास्त नसते. तथापि, रिफाइंड पिठामुळे मसाला पापडाचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असतो,

विचारात घेण्याजोगा महत्त्वाचा घटक म्हणजे पापडाचा आकार. आपण किती प्रमाणात पीठ खातो यावरून आपल्या शरीरात किती प्रमाणात रिफाइंड पीठ जाते हे ठरते, जे उच्च जीआयमुळे रक्तातील साखरेची पातळी वाढवू शकते. त्याव्यतिरिक्त आपण ते कशासोबत खातो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

मसाला पापड जास्त फायबर आणि कमी जीआय असलेल्या पदार्थांसोबत खाल्ले जातो, जसे की भाज्या किंवा सॅलड. अशा परिस्थितीत रक्तातील साखरेवर होणारा एकूण परिणाम कमी करता येतो, असे डॉ. अरोरा यांनी नमूद केले. तथापि, फक्त हा पापड किंवा त्याचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास सेवनानंतर पहिल्या ३० ते ६० मिनिटांत रक्तातील साखरेच्या पातळीत सौम्य ते मध्यम प्रमाणात वाढ होऊ शकते,मसाला पापड साखरयुक्त फिजी पेये किंवा अल्कोहोलसह सेवन केल्याने ज्यामध्ये रिक्त कॅलरीज जास्त असतात रक्तातील साखरेची पातळी लक्षणीयरीत्या वाढू शकते.

# आपत्कालीन परिस्थितीमध्ये सर्व यंत्रणांनी अलर्ट मोडवर काम करावे -मंत्री तटकरे

## दुर्घटना घडल्यास संबंधित यंत्रणेला जबाबदार धरणार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणावर मान्सूनपूर्व पाऊस सुरु आहे. सद्याची पावसाची आकडेवारी पाहता संभाव्य आपत्तींना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी सर्व यंत्रणानी सदैव दक्ष रहावे. सर्व दरड क्षेत्रात येणारी गावे, जुने व धोकादायक पूल व साकव आणि पाणीसाठे यांची सर्व विभागांनी पाहणी करून अहवाल सादर करावा. आवश्यकतेनुसार सर्वांनी कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. यंदा पूल अथवा रस्ता दुर्घटना घडल्यास संबंधित यंत्रणेला जबाबदार धरण्यात येईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यात निर्माण झालेल्या पावसाळी परिस्थितीचा आढावा, खबरदारी व जनजीवन सुरळीत होण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांसाठी मंत्री कु.तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली श्रीवर्धन विधानसभा क्षेत्र तसेच जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलिस अधीक्षक आचल दलाल, अलिबाग उपवन संरक्षक राहुल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक निशिकांत पाटील यांसह जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आपत्ती निवारण ही जिल्हा प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सांगून मंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद देणे महत्वाचे आहे. त्यासाठी प्रत्येक विभागाने नेमून दिलेली जबाबदारी चोख पणे पार पाडावी. तसेच निश्चित कार्यपद्धती योग्यरित्या राबवावी.

जिल्ह्यातील सर्व शाळा, रुग्णालये, पूल, साकाव, रस्ते यांचे प्राधान्याने स्ट्रक्चरल ऑडिट करावे. जेथे डागडुजी करणे शक्य आहे तेथे तात्काळ दुरुस्ती करावी. जेथे दुरुस्ती करणे शक्य नाही तेथे पर्यायी व्यवस्था करावी. यामध्ये हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. यंदा अशी कुठलीही दुर्घटना घडल्यास संबंधित विभागास जबाबदार धरले जाईल. तसेच कायदेशीर कारवाई केली जाईल असेही कु तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

पावसाळ्याच्या पूर्ण कालावधीत जिल्ह्यातील सर्व आरोग्य यंत्रणा सुसज्ज असावी. रुग्णवाहिका वाहन चालकासह सुसज्ज असाव्यात. त्यांची आवश्यक दुरुस्ती तात्काळ पूर्ण करून घ्यावी. सर्व प्राथमिक केंद्रात मनुष्यबळ आणि औषधसाठा उपलब्ध ठेवावा. पावसाळ्यात सर्प दंशाच्या मोठया प्रमाणावर दुर्घटना घडतात. त्यासाठीची आवश्यक सर्व औषधे उपलब्ध असावेत असे सांगून मंत्री कु तटकरे म्हणाल्या जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी रिक्त पदे भरण्यासाठी आरोग्य मंत्रीस्तरावरून पाठपुरावा करण्यात येईल असेही सांगितले.

जिल्ह्यातील ज्या ठिकाणी दरड कोसळणे किंवा पूर यामुळे संपर्क तुटतो अशा ठिकाणी रेशनचा अधिकचा साठा पुरवण्यात यावा. विद्युत विभागाने त्यांची सर्व यंत्रणा सुस्थितीत असल्याचे तपासून घ्यावे अशा सूचनाही कु तटकरे यांनी केल्या. जिल्ह्यातील नद्या, तलाव तसेच पारंपरिक पाणवठे यातील गाळ काढण्याची कामे प्राधान्याने करा. ज्योयोगे पाणीसाठा वाढेल तसेच जलस्त्रोत्यांचे संवर्धन होईल. तसेच शहरातील सर्व नाले सफाई येत्या चार दिवसांत पूर्ण करावी असे निर्देश कु तटकरे यांनी आज दिल्या.पशु संवर्धन विभागाने देखील या काळात खाजगी डॉक्टर यांच्याशी संपर्क साधून त्यांचे सहकार्य घ्यावे अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठया प्रमाणावर नुकसान होते आहे. या नुकसानीचे जैसे थे पंचनामे कृषी विभागाने तात्काळ करून जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल सादर करावा असे निर्देश कु.तटकरे यांनी दिले.

आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ साहाय्य मिळावे, यासाठी प्रशासनाने संबंधित यंत्रणांचे साहाय्य क्रमांक (हेल्पलाईन नंबर) उपलब्ध करून दिले आहेत. कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास ती आटोक्यात आणण्यासाठी आपल्याला संबंधित यंत्रणांचे साहाय्य घेता येईल. जिल्हा प्रशासनाने निश्चित केलेल्या सर्व आपत्कालीन सेवांचे संपर्क क्रमांक प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक गाव पातळीवर त्याची ठळक पणे प्रसिद्धी करण्याचे निर्देश मंत्री कु तटकरे यांनी दिले. शाळा तसेच समाज मंदिरे, सभागृह येथे पण त्याची प्रसिद्धी करावी असेही त्यांनी यावेळी सांगितले.आपत्तीच्या प्रसंगी शासन जनतेच्या पाठीशी असल्याचा विश्वास देण्याबरोबरच आवश्यक ते सर्व मदत कार्य वेळेत करावे असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

### दरडप्रवण क्षेत्राचे नव्याने मॅपिंग करणे गरजेचे

मागील घटनांचा विचार करता मॅपिंगमध्ये नसलेल्या ठिकाणीही दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक गावाची पाहणी ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या मार्फत करण्यात यावी. जी गावे दरडप्रवण क्षेत्रात येतात त्या ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात. या गावांची परिपूर्ण माहिती जिल्हा प्रशासनाकडे संकलित असावी. अचानक आपत्ती उद्भवल्यास तात्काळ मदत कार्य पोहोचविणे शक्य होईल.

# महाजने गावाचा पर्यायी रस्ता बंद

## दळवणवळणाची समस्या



**रेवदंडा: प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात महाजने गावाला जोडणारा पुलाचे काम सुरू असल्याने तुर्तास महाजने गावाच्या दळणवळणासाठी पर्यायी रस्ता नदीपात्रातून देण्यात आला होता. मात्र मुसळधार पावसाने नदी पात्रातील पाणी वाढल्याने पर्यायी रस्ता बंद झाला आहे.

बेलोशी मार्गे महाजने गावाला जोडणार्या रस्तातील नवीन पुलाचे बांधकाम सुरू असल्याने नदी पात्रातून पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात आला होता. परंतू मुसळधार पावसामुळे नदी पात्रातील पाणी वाढून रस्ता बंद झाला आहे. तसेच नवीन पुलाचे एका बाजूचे स्लॅबचे काम अपुर्ण असल्याने त्यावरून दळणवळण करणे अशक्य आहे.

या ठिकाणी तहसिलदार अलिबाग, सार्वजनिक बांधकाम खाते कार्यकारी अभियंता शेळके, रेवदंडा पोलिस ठाणे इन्चार्ज सपोनि श्रीकांत किरविले यांनी त्वरेने भेट देवून परिस्थितीचे अवलोकन केले. सदर पुलाचे काम त्वरील करण्यास अलिबाग तहसिलदार व सार्वजनिक बांधकाम खाते कार्यकारी अभियंता यांनी सुचीत केले आहे. त्याप्रमाणे काम सुरू करणेत आले आहे.

# तळा-तळेगाव रस्त्यावर बेलघर येथे झाड पडल्याने वाहतूक कोंडी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तळेगाव मुख्य रस्त्यावर बेलघर येथे मोठ झाड पडल्यामुळे वाहतूक बंद झाली होती ही बाब बेलघर ग्रामस्थांच्या लक्षात येताच सदर झाड ग्रामस्थांनी रात्रीच काढून रस्ता मोकळा केला.

अवकाळी पावसामुळे दि. २५मे रोजी रात्री ८.३०वाजता घ्या सुमारास मोठे झाड पडल्यामुळे रस्ता बंद झाला बेलघर ग्रामस्थ यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी स्वतः सर्वांनी अंधारात पाऊस आणि विजा चमकत असताना सुद्धा येणाऱ्या जाणाऱ्या पुढील गावातील लोकांना त्रास होऊ नये अंधारात एखादी गाडी जोरात आली तर त्यांचे नुकसान होऊ नये ह्या भावनेने तत्परता दाखवत दोन तासात रस्ता मोकळा करून पूर्ववत केले यामधे बेलघर ग्रामस्थ गोविंद जोंधळे ,केशव गोळे ,रमेश गोळे, दयाराम वाडकर, नितेश शेडगे, महेश साळुंखे ,दामोदर साळुंखे, तानाजी गोळे, शरद गोळे, तुकाराम भोसले ,सीताराम गोळे, चंद्रकांत आंबार्ले, सुभाष आंबार्ले, ग्रामपंचायत कर्मचारी विजय आंबार्ले ग्रामपंचायत सदस्य अजय सावंत, संजय हिलम ,मंगेश हिलम व सरपंच प्रविण आंबार्ले उपस्थित होते .




**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये डिजिटल बोर्ड खरेदी करणेबाबत सदरकामी अंदाजपत्रक बनविणे करिता बाजारभाव मागविण्यात येत आहेत. तरी निविदाधारक यांनी नमूद कामाचे दर हे अंदाजपत्रक बनविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागात विहित मुदतीत जमा करण्यात यावे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील माहिती व तंत्रज्ञान विभागात उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

**मुदत :**
पमपा/मातंवि/३०२५/प्र.क्र./ /२०२५
दिनांक : २६/०५/२०२५

**सही/-**
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल
पिन - ४१०२०६

**शुद्धीपत्रक**

दिनांक २४ मे २०२५ रोजीच्या रामप्रहर दैनिकात छापलेली जाहिरात (नागरिकांना जाहीर आवाहन) दि. २८/०५/२०२५ ते २९/०५/२०२५ रोजी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार होता.

परंतु हवामान खात्याने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत राहणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घ्यावी.
दि.२६/५/२०२५

**सही/-**
**(संजय कटेकर)**
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका,
पनवेल

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' -कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे,
**श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व**
**ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण**
ता. पनवेल, जि. रायगड (पिन-४१०२०६)
**संस्थापक :** डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लीट
Email : gavhan.scsvrr5@gmail.com

**Tender Notice**

| Sr.No. | Quantity | Description |
|---|---|---|
| 1 | 1857.48 | Providing & applying interior wall finish luster of approved make on internal wall surface.<br>Putty, primer, two coat with brush & oil with roller 19 to 21 X after allowing dry for the period 6 to 8 hrs. (with prior approval to S.E.)<br>S.S.R. Iterm No. 36.20<br>Two colour coat with brush or roller |

दिनांक : २६/०५/२०२५
जावक क्र.: 54/2025-26

Sd/-
Head Master
Shri Chhatrapati Shivaji Vidyalaya,
Gavhan

For More Information Contact No.: 9594904053
- Send the quotation on email within two days
- All rights are reserved to head master

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांचे कार्यालय**
प्लॉट नं. २१५, पहिला मजला, विद्या नगर, चेंढरे-अलिबाग, जि. रायगड
email: dwcoraigad@gmail.com

**निविदा सूचना क्र. ०८/ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड हे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या नोंदणीकृत सक्षम निविदाकांराकडून खालील कामाकरीता ई-निवीदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निवीदा मागवित आहोत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत.

सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजीत एकुण किंमत रु. |
|---|---|---|
| १ | मौज बल्हे येथे उपसा सिंचन योजना ता. रोहा जि. रायगड | २४,०९,२७५/- |
| २ | मौज येरळ येथे उपसा सिंचन योजना ता. रोहा जि. रायगड | २४,९०,७१०/- |
| ३ | मौज चिकणी पाटणसई येथे उपसा सिंचन योजना ता. रोहा जि. रायगड | १३,३१,१८०/- |
| ४ | सिमेंट कॉंक्रीट बंधारा बांधणे मौजे नगरोली ता. माणगाव जि. रायगड | ५४,६६,०७६/- |
| ५ | सिमेंट कॉंक्रीट बंधारा बांधणे मौजे वैजनाथ ता. रोहा जि. रायगड | १५,३०,९४०/- |
| ६ | सिमेंट कॉंक्रीट बंधारा बांधणे मौजे. मढाली बु. ता. रोहा जि. रायगड | १८,७४,१३९/- |

निविदा उपलब्ध कालावधी - दिनाक २७/०५/२०२५ ते ०३/०६/२०२५
निविदा उघडण्याचा - दिनाक ०५/०६/२०२५

जा.क्र. जिजअ/मृवजवि/रायगड/लेशा/६५१/२०२५
दिनाक २२/०५/२०२५

**सही/-**
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग,
रायगड

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक १० सन २०२५-२६**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासना कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना **दिनांक २२/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २९/०५/२०२५ रोजी १८.०० वाजे पर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक ३०/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक **३०/०५/२०२५** रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे गोळेगणी रोहीदासवाडी ता. पोलादपूर येथे सभामंडप बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (अ.जा. अ.ज. राखीव निधीतून) | ८४३८१६ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | मौजे निजामपूर वैशालीनगर बौध्दावाडी येथे रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ८१७०७२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | मौजे गोरेगांव रोहिदास नगर ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे. (अ.जा. अ.ज. राखीव निधीतून) | ८४४८४९ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | काळीज, ता. महाड बौध्दावाडी येथील बौध्द विहारासमोरील सभामंडप बांधणे (अ.जा.) तालुका महाड, जिल्हा रायगड | ४२१४४४ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ५ | ग्रा. पं. शिरसाड मशीदवाडी बौध्दवाडी स्मशानभूमी बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४१०३७३ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** **१. त**पशिलवार निविदा सूचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र. मवि/लेशा/निविदा/१८६६**
**दिनांक : २०/०५/२०२५**

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/४१**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**
**ई निविदा सूचना क्र. ०९/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १०/०५/२०२५ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक एक्टिव्ह टाईम्स, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई,दैनिक भास्कर, मुंबई,दैनिक खबरें आजतक, मुंबई,दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत, पुर्व बोली बैठक, कंत्राटदारांचे प्रश्न संकेतस्थळावर नोंदविणेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, ता.माणगाव व रोहा, जिल्हा रायगड येथे होणाऱ्या हायटेक फार्मास्युटिकल पार्कचा विकास, संचलन, देखभाल आणि व्यवस्थापनासाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (पीपीपी) या तत्वावर विकासकाची निवड करण्यासाठी प्रस्ताव ची विनंती. | ₹ ०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/०६/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक २७/०५/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. पुर्व अहर्ता बैठक दिनांक २८/०५/२०२५ रोजी मऔवि महामंडळ, प्रधान कार्यालय, वर्ड ट्रेड सेंटर, कॉम्प्लेक्स १, १२ वा मजला, कफ परेड, मुंबई या कार्यालयात सायं. ५ वाजता आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०३/०६/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.





# मुसळधार पावसामुळे कळंबोली जलमय

**कळंबोली : बातमीदार**

सोमवारी (दि.२६) सकाळपासून संततधार बरसणाऱ्या वरूण राजामुळे कळंबोली पाणी तुंबून संपूर्ण कळंबोली वसाहत जलमय झाल्याने नागरिकांना विविध संकटांशी सामना करावा लागला. व्यापारी दुकानांमध्ये ही पाणी घुसल्याने त्यांचेही अतोनात नुकसान झाले आहे. दुचाकी, चार चाकी पाण्याखाली बुडाल्याने शेकडो वाहनांचे आर्थिक नुकसान झाले आहे.



या मुसळधार पावसामुळे कळंबोलीसह सर्वच भागातील नागरिकांची त्रेधा तिरपीट उडाली होती. दरम्यान, कळंबोलीतील रस्ते कॉंक्रिटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी नाले खोदून ठेवले आहेत. काही ठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत. सकाळपासून धुवाधार बरसणाऱ्या पावसामुळे सुधागड हायस्कूल, सेंट जोसेफ स्कूल, स्टेट बँक परिसर, कारमेल हायस्कूल, सिंग हॉस्पिटल सप्तशृंगी माता मंदिर रस्ता, केएलइ ते सिंग हॉस्पिटल रस्ता, करावली नाका, कळंबोलीतील एमजीएम हॉस्पिटलचा बाजूचा परिसर, के एल फोर, केएल वन, एल.आय.जी भागात पाणी दोन ते अडीच फूट तुंबल्याने नागरिकांना, दुकानदार व्यवसायिक वाहनचालकांना तुंबलेल्या पाण्याचा सामना करावा लागला.

सेक्टर १० मधील न्यू मुंबई इंग्लिश स्कूल मध्येही पाणी भरल्याने मीटर बॉक्सला धोका निर्माण झाला. त्यात अनेक ठिकाणी रस्त्यामध्ये असलेल्या खड्ड्यांमध्ये पडून अनेक नागरिक ओले चिंब झाले व जखमी झाले. कळंबोली जलमय झाल्याने रोगराई पसरण्याची भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे. ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिक होत आहे.

याबाबत महापालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, महापालिकेची सर्व यंत्रणा कळंबोली वसाहतीस सेवा देण्यासाठी सज्ज आहे. अचानक झालेल्या पावसामध्ये भरतीचे पाणीही शिरल्याने कळंबोली वसाहतीमध्ये पाहणी भरले आहे. ते दुपारनंतर निश्चितच ओसरेल. महापालिकेची सर्व आपत्कालीन यंत्रणा ही कळंबोली वसाहतीमध्ये कार्यरत असून नागरिकांना चांगली सुविधा देण्याकडे आमचा निश्चित भर राहील. सायंकाळी चार वाजेपर्यंत कळंबोली वसाहतीतील पाण्याचा निचरा झालेला नव्हता.

## नवी मुंबईतील सीबीडीत दुकाने व घरांमध्ये शिरले पाणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात पावसाचा कहर सुरू असून जोरदार पावसामुळे शहरातील सीबीडी भागात दुकानांमध्ये व घरांमध्ये पाणी शिरले आहे सीबीडीतील सेक्टर ४,५,६ या परिसरातील हजारो दुकानांमध्ये व घरांमध्येपाणी शिरल्यामुळे दुकानदारांची तसेच नागरिकांची तारांबळ उडाली आहे. यापूर्वीही २०२१ मध्ये या विभागात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याची घटना घडली होती.



सीबीडी हा परिसर सखल भागात असल्याने सेक्टर १२ येथे असलेल्या पंपिंग स्टेशन वरून या विभागातील पाणी उचलून खाडीत सोडले जाते, परंतु सीबीडी सेक्टर १२ येथे असलेल्या पंपिंग स्टेशनचे काम नव्याने करण्यात येणार असल्याने हे पंपिंग स्टेशन तोडण्यात आले आहे. त्या ठिकाणी पावसाळ्यापूर्व पालिकेने खबरदारी न घेतल्याने फक्त एकच पंप लावण्यात आला असून सीबीडी भागातील पाणी उपसा न झाल्याने हजारो दुकानांमध्ये पाणी शिरले आहे.

या घटनेला पालिकेचे पालिकेचे अधिकारी जबाबदार असून दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे. पालिकेचे कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे यांना संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

## पावसाच्या पार्श्वभूमीवर पनवेल मनपातर्फे मदतकार्यासाठी संपर्क क्रमांक जारी

**पनवेल :** रात्रीपासून पडणाऱ्या सतत पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी संपूर्ण महापालिका यंत्रणेस अलर्ट मोडवर राहण्याचे निर्देश दिले असून सोमवारी (दि.२६) सकाळपासून सर्व विभागप्रमुख व विभाग अधिकारी आपापल्या कार्यक्षेत्रात मदत कार्यासाठी कार्यरत झाले आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता कोणताही प्रकारच्या मदतीसाठी पनवेल महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन टोल फ्री क्रमांक १८००२२७७०१, पनवेल कनेक्ट कॉल सेंटर क्रमांक ८९६०९१६०९१ पनवेल महानगरपालिकेचे अग्निशमन केंद्र नवीन पनवेल २२६९३६५६७०, कळंबोली २२६९३६५८०२, पनवेल ०२२२७४६१५०० यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर जेएनपीएचा ३६वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

भारताचे सर्वोत्तम कार्यप्रदर्शन करणारे बंदर म्हणून ओळख असलेल्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (जनेप प्राधिकरण) सोमवारी (दि.२६) आपला ३६ वा वर्धापन दिन साजरा करताना भारतातील कंटेनर बंदर क्षेत्रात आपले स्थान भारताचे सर्वात मोठे कंटेनर बंदर म्हणून नव्याने परिभाषित केले. या विशेष कार्यक्रमात भारत सरकारचे बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात अनेक मान्यवर उपस्थित होते, त्यात बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग केंद्रीय राज्यमंत्री शांतनू ठाकूर, सचिव टी. के. रामचंद्रन, महासंचालक (शिपिंग) श्याम जगनाथन, कस्टम्स, मुंबईचे मुख्य आयुक्त विमलकुमार श्रीवास्तव, आयडब्ल्यूएआयचे अध्यक्ष विजयकुमार, ऑलकार्गो ग्रुपचे अध्यक्ष शशिकिरण शेट्टी, जेएम बक्षी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक ध्रुव कोटक विविध उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी व जनेप प्राधिकरणचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष व व्हीपीपीएलचे अध्यक्ष आणि कार्यकारी महासंचालक उन्मेष शरद वाघ यांनी सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत केले.





कार्यक्रमादरम्यान वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमासाठी दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. पहिला सामंजस्य करार व्हीपीपीएल आणि सह्याद्री फार्म्स यांच्यात झाला असून, ग्रामीण तरुण, शेतकरी आणि शेतमाल उत्पादन कंपन्यांचे कौशल्यविकास करण्यासाठी लक्ष केंद्रित प्रशिक्षण देण्याचा उद्देश आहे. या सहकार्याचा उद्देश म्हणजे कृषी–लॉजिस्टिक्स मूल्यसाखळीला बळकटी देणे आणि स्थानिक समुदायांना उदयोन्मुख संधींसाठी तयार करणे.

दुसरा सामंजस्य करार व्हीपीपीएल आणि रूरल एनहॅन्सर्स प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांच्यात झाला असून, वधवन पोर्टवर कंटेनर, बाळक आणि लिक्विड कार्गो हाताळण्यासाठी टर्मिनलच्या विकासात सहभागी होण्याचा त्यांचा उद्देश नमूद केला आहे. तसेच, समुद्री सेवा, इंटरमोडल कनेक्टिव्हिटीसाठी सहाय्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे, आणि डिजिटल सोल्यूशन्स, मजबूत आयटी इन्फ्रास्ट्रक्चर आणि संरचित मनुष्यबळ प्रशिक्षण व कौशल्यविकासाच्या माध्यमातून पर्यावरणीय टिकाव सुनिश्चित करणे याचा देखील यात समावेश आहे. हे भागीदारी उपक्रम वाढवण बंदराला एक आधुनिक, सर्वसमावेशक आणि भविष्योन्मुख सागरी प्रवेशद्वार म्हणून घडविण्याच्या जनेप प्राधिकरणाच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे.

कार्यक्रमात बोलताना जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष व व्हीपीपीएलचे अध्यक्ष आणि कार्यकारी महासंचालक उन्मेष शरद वाघ यांनी सांगितले की, ३६ वर्षांच्या वाटचालीनंतर, जेएनपीए एका टप्प्यावर उभे आहे – हा यशाचा थांबा नाही, तर अधिक जबाबदारीची सुरूवात आहे. भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर बनणे ही केवळ आकड्यांची गोष्ट नाही, तर हे शिस्तबद्ध नियोजन, विविध क्षेत्रांतील समन्वय आणि कर्मचाऱ्यांच्या शांत पण दृढ प्रयत्नांची साक्ष आहे. ही प्रगती आमच्या टीमच्या मेहनतीने, व्यापार भागीदारांच्या विश्वासाने आणि भारत सरकारच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याने शक्य झाली आहे.

समारंभानंतर एक पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये सागरी व लॉजिस्टिक्स क्षेत्रातील व्यावसायिक तसेच जनेप प्राधिकरणाचे कर्मचारी यांना त्यांच्या उत्कृष्ट योगदान आणि सेवा गुणवत्तेबद्दल गौरवण्यात आले. हे पारितोषिक त्यांच्या समर्पण आणि प्रयत्नांचे कौतुक करण्यासाठी होते, ज्यांनी जनेप प्राधिकरणाला आजच्या उंचीवर पोहचविण्यात मदत केली.

जनेप प्राधिकरण त्यांच्या विस्तार योजनांसह आणि स्मार्ट पोर्ट उपक्रमांसह पुढे जात असताना, भारताच्या सागरी व्यापाराला अधिक बळकट करत आहे आणि जागतिक व्यापारासाठी एक महत्त्वाचे प्रवेशद्वार म्हणून आपली भूमिका अधिक दृढ करत आहे.

## पावसाळी स्थितीत नवी मुंबई महापालिका दक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

कालपासून बरसत असलेल्या जोरदार पावसाच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात पहिल्या मजल्यावर असलेल्या इंटिग्रेटेड नियंत्रण कक्षात जाऊन शहरात ठिकठिकाणी लावलेल्या सीसीटीव्हींच्या दृश्यांची पाहणी करीत सद्यस्थितीचा आढावा घेतला.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एक हजार २७५ सीसीटिव्हींव्दारे विविध ठिकाणांवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. पावसाळा कालावधीत या कक्षाचा आपत्कालीन स्थिती नियंत्रणासाठी व मदतकार्यासाठी उपयोग होत आहे. आयुक्तांनी याद्वारे शहरातील विविध ठिकाणांच्या स्थितीची पाहणी करीत सर्व अधिकाऱ्यांना आपापल्या क्षेत्रांमध्ये सक्रिय राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच आवश्यक त्या ठिकाणी तत्परतेने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

पाणी निचरा होण्याची दक्षता घेतली जात होती. शहर सुरक्षित असून जनजीवन सुरळीत सुरू होते. नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती आपत्ती निवारण कक्षाशी ०२२–२७५६७०६०/०२२–२७५६७०६१ या क्रमांकावर अथवा १८००२२२३०९/१८२२२३१० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## अभिनयासाठी एकाग्रता महत्त्वाची –ज्येष्ठ रंगकर्मी संजय हळदीकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिनयासाठी एकाग्रता, निरिक्षण व कल्पना शक्ती महत्त्वाची असते. यांचा यथायोग्य उपयोग निश्चितच सादरीकरणात होतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी, नाटककार, प्रशिक्षक संजय हळदीकर यांनी सोमवारी (दि.२६) केले. नाट्यगृह सुरू असलेल्या प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. श्री. हळदीकर यांनी सिनियर व जूनियर दोन्ही गटांमध्ये सादरीकरण पद्धती, सुसुत्रता, नाटकातील नाट्य, अभिनयाचे सौंदर्यशास्त्र, वाचिक अभिनय आणि शैली यांची प्रात्यक्षिके, मार्गदर्शन आणि सैद्धांतिक आधार याबाबतचे महत्त्वपूर्ण प्रशिक्षण दिले.



ज्येष्ठ रंगकर्मी कथा मूक अभिनयाचे अभ्यासक संकेत खेडकर यांनी शिबिरार्थींना मूक अभिनय हा अभिनयासाठी प्रबळस्थान आहे, असे सांगत प्रशिक्षणार्थींना मूक अभिनय शिकवून बोलके केले. त्यांनी मुकाभिनयाची मूलतत्वे, अभिनेत्याने नाटकात शरीर भाषेचा उपयोग कसा करावा, शरीर भाषेचा उपयोग करून अभिनेत्याने विचार, विषय आणि गोष्ट प्रभावीपणे कशी पोहचवावी या विषयी प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शन केले.

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर पनवेल येथे सुरू आहे.

या वेळी मनपाचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, अ.भा. मराठी नाट्य परिषद शाखा पनवेलचे प्रमुख कार्यवाह शामनाथ पुंडे यांच्या हस्ते दोन्ही प्रशिक्षकांना शाल पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले. प्रशिक्षक प्रा.रवि धुतडमल, प्रा. अशोक केंद्रे, प्रा. प्रज्ञा सोसे या वेळी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दोन गटात हे अभिनय शिबीर घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिला गट वय वर्षे ८ ते १६ व दुसरा गट१६ ते ६० वयांपर्यंत आहे. सकाळी १० ते १ व दुपारी २ ते ५ अशा दोन टप्प्यात सात दिवस हे अभिनय शिबिर होणार आहे. शिबिरासाठी प्रत्येक गटामध्ये ४० /४० प्रशिक्षणार्थी आहेत.

### तीन दिवस मान्यवरांकडून मार्गदर्शन

२७ मे रोजी प्रा. डॉ. जयंत शेवतेकर व अमोल भावे, २८ मकरंद पाध्ये आणि २९ रोजी डॉ. संजय पाटील या ज्येष्ठ कलावंताचे मार्गदर्शन शिबिरात होणार आहे. या अभिनय शिबीराचा समारोप ३० मे रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. या वेळी सहभागी शिबिरार्थींचे सादरीकरण होणार असून सर्व शिबीरार्थींना सहभाग प्रमाणपत्र ही देण्यात येणार आहेत.

## श्रोत्यांनी अनुभवला वैशाखातील गारवा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे वैशाखातील गारवा अनोखा कार्यक्रम झाला. नवी मुंबई साहित्य परिषद मासिक उपक्रमांतर्गत वैशाखातील गारवा हा अनोखा कार्यक्रम तुर्भे येथे झाला. साहित्य परिषदेच्या कार्यक्रमासाठी राधा गानू यांनी विषय मांडणी केली. वैशाख वणवा आपल्या सर्वांना माहिती आहे, परंतु वैशाखा मध्येदेखील विशिष्ट प्रकारचा साहित्यिक गारवा कशा प्रकारचा असतो याचे सुंदर विवेचन त्यांनी आपल्या अनुभवातून केले.





कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा गवस मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवी मुंबई साहित्य परिषदेचे आधारस्तंभ डॉक्टर नंदकिशोर जोशी, वृक्षप्रेमी आबा रणावरे, वक्ता राधा गानु यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन केले. विशेष म्हणजे शब्द संवाद मे महिन्याच्या अंकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मिसाळ यांनी केले. प्रास्ताविकामध्ये नवी मुंबई साहित्य परिषद करत असलेल्या उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी साहित्यिक उपक्रमाचे आयोजन केले जाते. साहित्य परिषदेतर्फे साहित्यिकांसाठी साहित्यिक अभ्यासक्रमाचे आयोजन केले गेले होते. गेली नऊ वर्षे दरवर्षी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. चैत्रपालवी हा विशेष अंक वर्षातून एकदा प्रकाशित केला जातो. नवोदित साहित्यिक लेखक कवी यांच्या साहित्याचे प्रकाशन देखील नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे केले जाते.

या कार्यक्रमांमध्ये दिलीपजी जांभळे, संतोष जाधव, ऋतुजा गवस क्षमा वखारकर, मिलिंद कल्याणकर, स्मिता वाजेकर यांनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे आभार संतोष जाधव यांनी मांडले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

## जोरदार पावसाने जनजीवन विस्कळीत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ आणि बेलापूर येथे रविवारपासून पडत असलेल्या अवकाळी पावसाने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले. नेरूळ येथील काही ठिकाणी गटारीतील कचरा आणि घाण वेळीच उचलला गेला नसल्याने वादळी पावसात तो पुन्हा गटारीत पावसाच्या पाण्याचा प्रवाह थांबल्याने सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते, तर बेलापूर येथील आयकर कॉलनीत धुआधार पावसाने सोमवारी (दि.२६) दुपारपर्यंत पाणी तुंबल्याचे दिसले.



बेलापूर येथील आयकर कॉलनी मध्ये पारसिक हिलच्या दोन्ही डोंगरावरून पाणी आयकर कॉलनीत शिरल्याने सकाळी त्या परिसरात पुरसदृश स्थिती निर्माण झाली होती. आयकर कॉलनीतील कै. जोमा पाटील मार्ग येथील सिडकोने निर्माण केलेला होल्डिंग पॉंड आजमितीला अस्तित्वात नाही. त्यामुळे जोराच्या प्रवाहाने पारसिकहिल डोंगराच्या दोन्ही बाजूने येणारे पाणी बॅक वॉटर नसल्याने तिथे थांबून या परिसराला तलावाचे स्वरूप आले होते.

रविवारपासून पडलेल्या अवकाळी धुवाधार पावसात नेरुळ ठिकाणी ८ तर बेलापूर ठिकाणी ३ झाडें पडल्याच्या घटना घडल्या. नेरूळ रेल्वे स्टेशन लगत उभ्या असलेल्या लक्झरी बसच्या टपावरती पडलेले झाड, वंडर पार्क सेक्टर १९ येथे पडलेली दोन झाडे, सेक्टर २५ नेरूळ येथे रस्त्यावर कोसळून पडलेले एक झाड, सिवूड्स निरोजन हॉस्पिटल रस्त्याच्या मधोमध पडलेले अतिविक्राळ झाड, ग्रँड सेंटर मॉल सेक्टर ४० नेरूळ लगत पडलेले झाड, नवीन सेक्टर ५०, पामबीच सिग्नल रोडवरती पडलेली दोन झाडे घटनास्थळी जाऊन पेट्रोल स्वा कटरच्या साह्याने तोडून रस्ता रहदारीसाठी मोकळा करून दिल्याची माहिती अग्निशमन दल अधिकारी विकास कोळी यांनी दिली.

**आयकर कॉलनीमध्ये सिडकोने निर्माण केलेला होल्डिंग पॉंड अस्तित्वात नाही. परिणामी, पारसिक डोंगरावरून जोरात येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे येथे दरवर्षी पुरसदृश स्थिती निर्माण होते. येथे बॅक वॉटर मार्ग नवी मुंबई मनपाने निर्माण करावा, अशी मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत.**

**–सुभाष गायकवाड, आयकर कॉलनी**

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अवजड वाहनांमध्ये लेन शिस्तीचा अभाव

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शनिवारी संध्याकाळी लेनची शिस्त मोडून ट्रेलर कंटेनर चालवत दोघांचा बळी आणि सहा जणांना गंभीर दुखापतीला कारणीभूत चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तरीही लेनची शिस्त पाळून प्रवास करणार्‍या प्रवाशांच्या सुरक्षिततेबद्दल प्रश्नचिन्ह कायम आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पुण्याहून मुंबईच्या दिशेने येताना बोर घाटातील आडोशी टप्पा अपघातामुळे कायम चर्चेत राहिला आहे. उताराचा रस्ता यामुळे वाहनाच्या गतीवर नियंत्रण यावे यासाठी घाट उतरताना हलक्या वाहनांसाठी पन्नास किमी प्रतितास तर अवजड मोठ्या वाहनांसाठी चाळीस किलोमीटर प्रतितास वेग मर्यादा आहे, परंतु सर्रासपणे वेग मर्यादेचे उल्लंघन वाहन चालक करतात. याशिवाय लेनची शिस्तीचा अभाव कायम दिसून आला आहे.



अवजड वाहन ओव्हरटेक साठी असणार्‍या लेनचा सर्रास वापर करत असल्याने हलक्या वाहनासाठी कायम धोकादायक ठरत आहेत. शनिवारचा अपघातदेखील ट्रेलर कंटेनर लेनची शिस्त मोडून आल्याने घडला.

अवजड वाहने, हलकी वाहने आणि ओव्हरटेक करण्यासाठी तीन लेनची रचना आहे. खालापूर तालुका हद्दीत घाट उतरून मुंबुईकडे जाताना आडोशी उतार अपघाताचा हॉटस्पॉट बनलेला घाट उतरताना असलेली वेग मर्यादेचे पालन वाहनचालक करत नसून इंधन वाचविण्यासाठी ट्रेलर कंटेनर आणि ट्रक आणि टँकर वाहनांचे चालक वाहन न्यूट्रल करतात. यामुळे अनेकदा ब्रेक न लागणे अपघाताचे कारण होते. इंधन बचतीच्या नादात अवजड वाहनचालकांकडून न्यूट्रल गिअरमुळे उतार व वळणावर वाहन अनियंत्रित होते. बंद पडलेले वाहन हे देखील अपघाताचे कारण आहे.

खालापूर टोल नाक्यापर्यंत साधारण आठ, किलोमीटरची चौथी लेन केवळ अवजड वाहनांच्या वापरासाठी ठेवण्यात आली आहे, परंतु लेनची शिस्त पाळली जात नसल्याने अपघात वाढले आहेत.

**उपाययोजना**

मिसिंग लिंकमुळे अपघात पट्टा वगळला जाणार असून वेळेत बचत होणार आहे. मिसिंग लिंक लवकर तयार होण्याची नितांत गरज आहे. घाट टप्प्यामध्ये हॅलोजनची व्यवस्था, वेग मर्यादित बदल असे प्रयोग २०२३मध्ये करण्यात आले आहेत, परंतु अवजड वाहनानी लेन शिस्तीचा अभाव यासाठी मोठ्या दंडात्मक कारवाईची आवश्यकता आहे.

**शनिवारी झालेला अपघात हा लेनची शिस्त न पाळल्याने झाला. दोन बस आणि अपघात करणारा अवजड ट्रेलर अशी वाहन तिसर्‍या लेन मध्ये होती. अशा वाहनावर कारवाई झाली तर जिवघेणे अपघात टाळता येतील.**

**-गुरुनाथ साठेलकर, हेल्प फाऊंडेशन**

# खोपोली, खालापुरात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत





**खालापूर : प्रतिनिधी**

मोसमी पावसाने २० दिवस अगोदरच सुरुवात केली असून खोपोली खालापूरसह मागील २० दिवसांपासून रिपरिप बरसणार पाऊस रविवारी मध्यरात्री मुसळधार कोसळला याने मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील एम्पायर या बिल्डिंग समोर पाणी साठवून महामार्ग पाण्याखाली गेला होता तर खोपोली-पेण मार्गावरील साजगाव येथे महाकाय वडाचे वृक्ष रस्त्यामध्ये कोसळल्याने येथील वाहतूक ठप्प होती. खोपोली नगरपालिका अग्निशमन दल आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी हे वृक्ष बाजूला केल्यानंतर सकाळी ९ वा. महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

## मे महिन्यातच नद्यांना पूर

२० मे २००५ रोजी अशाच प्रकारचा पाऊस उन्हाच्या तडाख्यात रायगड जिल्ह्यात कोरड्या असणार्‍या नद्या तुडुंब भरून वाहत होत्या तर शेतकर्‍यांना ही दिलासा मिळाला होता. पिण्याच्या पाण्याची समस्या सुटली होती अशीच परिस्थिती तब्बल २० वर्षानंतर खोपोली खालापूरसह रायगडात निर्माण झाली आहे.

खोपोली नगरपालिकेच्या गटार स्वच्छ मोहीम पूर्ण फसली. खोपोली नगरपालिकेने मागील महिन्यापासून नगरपालिका क्षेत्रातील नाले, गटारे जेसीबी मशीनच्या सहाय्याने स्वच्छ केली होती. या कामाबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी नाले साफ करण्याच्या कामाबाबत शंका व्यक्त केली होती. ती शंका खरी ठरली असून खोपोलीच्या काटरंग विणानगर शास्त्रीनगरमधील काही घरांमध्ये पाणी शिरले.

शिळफाटा जैन मंदिर या परिसरात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पाणी साठून नालेही तुडुंब भरले होते.

## शनी जयंतीनिमित्त नागोठण्यात कार्यक्रम

**नागोठणे : बातमीदार**

वैशाख वद्य ३० अमावस्या मंगळवारी (दि.२६) शनिजयंती उत्सवाचे आयोजन श्री जोगेश्वरी माता मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले आहे. या वेळी श्री शनिदेवांचे क्रुपा आर्शिवाद प्राप्त करावे ही मंगल कामना, अशी विनंती श्री शनि सेवा समिती नागोठणे-रायगड यांच्याकडून करण्यात आली आहे.

मंगळवारी संध्याकाळी ७ वाजता स्थापना सोहळा होणार असून ७:३० वाजल्यापासुन दर्शन सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. रात्री ९:३० महाआरती होणार असून अनिश्चीत हवामाना मुळे यावर्षी महाप्रसाद (शनि भंडारा) स्थगित करण्यात आला असल्याची माहिती शनि सेवा समिती नागोठणे-रायगड यांनी दिली आहे.

# रायगडात १५ दिवस जमावबंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या शिफारशीनुसार आणि अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशानुसार २५ मे २०२५ रोजी ००:०१ वाजल्यापासून ते ८ जून २०२५ रोजी रात्री २४:०० वाजेपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर, खोपोली, रसायनी, रोहा, माणगाव, महाड, नागोठणे, अलिबाग या औद्योगिक भागांमध्ये कामगार संघटनांकडून आंदोलन व संप पुकारले जात असल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय धार्मिक व जातीय तणावाचे प्रसंग, तसेच आगामी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती (३१ मे), रवी रावसाहेब देशमुख, उमापूर, ता.गेवराई, जि.बीड हे किल्ले रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या पुतळ्याला झेड प्लस दर्जाची सुरक्षा महाराष्ट्र सरकारने द्यावी तसेच इतर विविध मागण्याकरिता किल्ले रायगडच्या पायथ्याशी बेमुदत धरणे आंदोलन (३१ मे) आणि छत्रपती शिवाजी महाराज ३५२ वा राज्याभिषेक सोहळा कार्यक्रम (६ जून ) यामुळे देखील अस्थिरता उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन ही अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

जमावबंदी दरम्यान खालील गोष्टींवर बंदी असेल :शस्त्र, लाठ्या, सुरे, तलवारी इ. वस्तू बाळगणे, स्फोटक किंवा ज्वलनशील पदार्थ घेऊन फिरणे, दगडफेक किंवा क्षेपणास्त्रे बाळगणे व तयार करणे, प्रतिमा किंवा आकृत्यांचे सार्वजनिक प्रदर्शन करणे, आक्षेपार्ह घोषणा, गाणी किंवा वाद्य वाजविणे, धोकादायक भाषण, हावभाव, चित्रप्रदर्शन पाच किंवा अधिक व्यक्तींचा जमाव परवानगीशिवाय जमविणे

या अधिसूचनेतून शासकीय अधिकारी, शासकीय कर्तव्यावरील कर्मचारी, तसेच शवयात्रा व अंत्यविधीसाठी जमणारा जमाव, आणि तहसीलदारांच्या परवानगीने आयोजित कार्यक्रम वगळण्यात आले आहेत. तहसीलदार किंवा कार्यकारी दंडाधिकार्‍यांनी परवानगी दिल्यासच कोणताही उत्सव, सभा, मिरवणूक आयोजित करता येणार असून त्याची जबाबदारी आयोजकांची असेल. पोलीस व जिल्हा प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# वावंढळ गावच्या हद्दीत पुलावर पुन्हा अपघात

## एकाचा मृत्यू; पुलाचे वळण काढण्याची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

जुना मुंबई पुणे रस्त्यावर वावंढळ गावच्या हद्दीत वावंढळ पुलावर रात्री सव्वा नऊ वाजता अपघात होऊन कंटेनर गाडी पुलाखाली दूरवर जाऊन कोसळून एकाचा मृत्यू झाला आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार म्हणजे जुना मुंबई पुणे रस्त्यावर वावंढळ हद्दीत वावंढळ पुलावर रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास एमएच ४६/बीयु /२१९७ हा लोखंडी क्राईल माल भरलेला कंटेनर पनवेल दिशेकडे जाताना एका कार गाडीला धडक देऊन पुलावरून कोसळून दूरवर जाऊन पडला, यात एकाचा मृत्यू झाला असून कार गाडीतील दोघेजण सुखरूप आहेत.



अपघाताची खबर मिळताच अपघात ग्रस्त टीमचे गुरुनाथ साठेलकर यांनी पोलीस यंत्रणा आणि अपघातग्रस्त ठिकाणच्या लोकांना संपर्क साधला आणि स्वतः आपल्या टीम सह दाखल झाले. स.पोलीस निरीक्षक संतोष औटी चौकचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

भयाण अंधारात शोधकार्य सुरू झाल्यावर कंटेनर पासून दूर अंतरावर एक मृत्यूमुखी माणूस सापडला. कंटेनर अगदी उताणा पडल्याने कंटेनर खाली आणि लोखंडी क्राईल खाली कोण आहे का? याचा शोध बॅटरी च्या उजेडात सुरू झाला पण काही आढळले नाही. अपघात ग्रस्त कार रात्रीत बाजूला करण्यात आली आहे. पहाटे मुसळधार पाऊस सुरू झाला आहे, अगदी कंटेनर जवळून पाणी वाहत आहे, हा कंटेनर काढणे खूप जिकिरीचे होणार आहे, त्यातच मुसळधार पाऊस सुरूच आहे.

सकाळी स्थानिक पत्रकार अर्जुन कदम व केतन कदम यांनी घटनास्थळी जाऊन शोध घेतला असता ज्या ठिकाणी मयत व्यक्ती सापडली त्या ठिकाणी ड्रायव्हिंग लायसन्स मिळाले असून त्यावर रामचंद्र बर्मा असे नाव असून वडाळा मुंबई असा पत्ता आहे.

यापुलावर वारंवार अपघात होत आहे. अनेकांचे जीव गेले असून आर्थिक नुकसान याचा अंदाज करता येत नाही, तरीही याकडे संबंधित यंत्रणेचे लक्ष नाही.

# माणगावात मुसळधार पाऊस

## काळ नदीच्या पाण्याची पातळी वाढली



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात मुसळधार पावसाने थैमान घातले असून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहरातुन वाहणार्‍या काळनदीच्या पाण्याची पातळी वाढली असून नदी काठच्या लोकांना व जवळच्या गावांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

तालुक्यात गेले दोन दिवस रात्रंदिवस मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे अनेकांनी घरातच राहणे पसंत केले आहे. त्यामुळे बाजारपेठ ओस पडत असल्याने दुकानदारांच्या व्यवसायावरही त्याचा परिणाम झाला आहे. मुसळधार पावसामुळे माणगाव शहरातून वाहणार्‍या काळनदीच्या पाण्याची पातळी हळू हळू वाढत असून शहरात चोहोबाजूनी पाणीच पाणी दिसत आहे. या मुसळधार पावसामूळे तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांचा माणगाव शहराकडे येण्याचा संपर्क तुटला आहे. हा मुसळधार पाऊस असाच आणखीन दोन दिवस पुढे सुरू राहिल्यास काळनदी धोक्याची पातळी ओलांडेल असे वाटत असल्याने नदी काठच्या लोकांना व जवळच्या गावांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# डॉ. वरुण वागळे यांचे वैद्यकीय क्षेत्रात धवल यश

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यातील नामांकित प्रतिथयश बालरोग तज्ञ डॉ. आंनद वागळे व औद्योगिक वसाहतमधील वैद्यकीय सल्लागार डॉ. मिनल वागळे यांचा सुपुत्र डॉ. वरुण वागळे यांनी वैद्यकीय क्षेत्रात गेली १७ वर्षे रोह्याच्या बाहेर राहून मेहनत घेऊन एमबीबीएस, एमडी आणि गॅस्ट्रॉएन्टरोलॉजिस्ट ही दिल्ली युनिव्हरसिटीची परीक्षा उत्तम गुण मिळवून धवल यशसंपादन करून रोहेकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



रोह्याचे राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाचे रोहा तालुका कार्याध्यक्ष समीर शेडगे यांनी डॉ. वरुण वागळे त्यांच्या निवास स्थानी जाऊन डॉ. वरुण आंनद वागळे याला शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ प्रदान करून सत्कार केला आणि कौतुक केले. तसेच त्याची पत्नी डॉ. इशा वरुण वागळे हीदेखील एम. डी. पास झाल्या बद्दल आणि डॉ. आनंद वागळे डॉ. सौ. मिनल वागळे यांचेदेखील समिरशेठ शेडगे यांनी अभिनंदन आणि मनापासून शुभेच्छा दिल्या.

# कोलाड येथील रस्त्यावरचा कचरा हटविला

## रोहा तालुक्यात 'आरआयए'ची तत्परता

**धाटाव : प्रतिनिधी**

कोणतेच रस्ते, नदीनाले, मैदाने कचरामुक्त नाहीत. अनेक गावे, ग्रामपंचायतीचा परिसर अक्षरशः डम्पिंग ग्राऊंड झालेत. त्याचा फटका पर्यावरण यांसह मोकाट गुरे, पशुपक्षी यांना बसत आहे. तरीही कोणाचेच डोळे उघडत नाहीत, हे भयान वास्तव असतानाच काही संस्था, व्यक्ती स्वच्छता दूत म्हणून कायम काम करतात. याचीच अनुभूती रोहा इन्डस्ट्रिअल असोसिएशन (आरआयए)च्या स्वच्छता उपक्रमातून सबंध रोहेकरांना आली.



जनशोभा पेट्रोल पंप लगतच्या हार्डवेअर, ट्रान्सपोर्ट गाळ्यांत रविवारी एका कार्यक्रमासाठीचा प्रवाशांना वाटलेल्या खाद्यांचा विविध कचरा बेधडक रोहा कोलाड मुख्य रस्त्यावर टाकण्यात आला. तो कचरा अगदी एक किलोमीटर अंतरावर अस्तव्यस्त पसरला. त्यामुळे रस्त्यालगत पांढरठिक्क कचर्‍याचे दृश्य पाहायला मिळाले. ही गंभीर बाब आरआयएचे अध्यक्ष, उद्योजक पी पी बारदेशकर यांच्या नजरेत आली आणि तातडीने स्वच्छता दूत म्हणून मोहीम सुरू झाली. मुख्य रस्त्यालगत सर्वत्र पसरलेला कचरा तत्परतेने साफ करण्यात आल्याची सुखद अनुभूती मिळाली. दरम्यान, रोहा कोलाड मुख्य रस्त्यालगत काहींच्या बेशिस्तपणामुळे टाकलेला प्लास्टिकमय कचरा तातडीने उचलण्यासाठीची तत्परता आरआयएच्या स्टाफ, कर्मचार्‍यांनी दाखविल्याने सर्वत्र कौतुक होत आहे तर सतत औद्योगिक भरभराटात व्यस्त असलेल्या आरआयएने रविवारी चक्क स्वच्छता दूत म्हणून सकारात्मक संदेश दिला असल्याचे बोलले जात आहे.

रोहा शहर, तालुका दिवसेंदिवस मुख्यत: प्लास्टिकमय टाकावू कचर्‍याच्या विळख्यात सापडला की काय? असेच पाहायला मिळत आहे. कुंडलिकेचे दोन्ही किनारे अक्षरश: कचर्‍याने फुल्ल टू झालेत. जागोजागी कचर्‍याचे ढीग आहेत, यातून ग्रामीण भागाचीही सुटका नाही. नदीनाले, रस्ते, कालवा, माळ मैदानावरील डम्पिंग ग्राऊंड दृश्याने पर्यावरण र्‍हासाची घंटा वाजत आहे. तरीही विविध संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सरकार भानावर येत नाही. अशात सामाजिक बांधिलकी जोपासणार्‍यांचा कौतुक करणे क्रमप्राप्त आहे. दुसरीकडे कचरा इतरत्र टाकण्यात सुशिक्षीत लोकही मागे नाहीत.

घरगुती, सार्वत्रिक कार्यक्रमाचा कचरा रस्त्यालगत, नदीनाल्यात टाकला जातो, याची प्रचिती रविवारी आली. जनशोभा पेट्रोल पंप लगतच्या आयोजित व्यवसायिक गाळा कार्यक्रमात रस्त्यावरून ये जा करणार्‍या प्रवाशांना नाश्ता, ठंडा, चहा दिला जात होता, अशी माहिती मिळाली. त्यातूनच कचरा बेधडक रस्त्यालगत फेकला गेला आणि सर्वत्र कचराच कचरा झाला, ही गंभीर बाब अध्यक्ष पी पी बारदेशकर यांच्या निर्दशनास आली. लगेचच स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. आरआयएचे कार्य. संचालक दयानंद नांदगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्टाफ व कर्मचारी स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले. कर्मचार्‍यांनी स्वच्छता दूत बनत एक्सेल थांबा ते जनशोभा पेट्रोल पंप दरम्यानचा मुख्य रस्ता तातडीने साफ केला.

इतरत्र पडलेला कृत्रिम कचरा उचलण्यात आला. दुसर्‍यांनी केलेल्या मुख्य रस्त्यालगतचा कचरा एकत्रित करून विल्हेवाट लावण्यात आली. आरआयएने तत्परता दाखवून रस्त्यालगत टाकलेला कचरा तातडीने साफ केल्याने सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# आगामी सणांच्या अनुषंगाने खालापूर पोलीस ठाण्यात बैठक

**चौक : प्रतिनिधी**

आगामी बकरी ईद सणाच्या अनुषंगाने खालापूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील मशिदींचे ट्रस्टी, गावचे कारभारी, शांतता मोहल्ला कमिटी सदस्य यांची बैठक आयोजित करून शांतता व सुव्यवस्था संदर्भात सूचना केल्या.



या वेळी बकरी ईद कालावधीत गोवंश हत्या, जनावर चोरी, गोवंश मांस विक्री यासारखे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घेण्यात घ्यावी, नमाजपठण वेळचे योग्य ते नियोजन करून गर्दी होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना करण्यात आल्या. कुर्बानी वेळी गोवंश हत्या होणार नाही तसेच बोकडाची कुर्बानी झाल्यावर राहीलेले टाकाउ, मांस उघड्यावर राहणार नाही याचे योग्य ते नियोजन करावे.

हाल खुर्द, मधला हाल व हाल बुद्रुक या तिन्ही गावांच्या प्रवेश द्वारा जवळ पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून येणार्‍या वाहनांची तपासणी केली जाईल, त्यावेळी सहकार्य करावे. कोणत्याही हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते गावामध्ये आल्यास कोणत्याही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न करता त्यांची माहिती पोलीस ठाण्यात त्वरित देण्यात यावी. सोशल मिडीयावर आक्षेपार्ह समाजामध्ये जातीय तेढ निर्माण होईल, असे कोणत्याही प्रकारचा संदेश, मजकुर, चित्रफिती, बॅनर, पोस्टर प्रसारीत होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.

या वेळी यासीन भालदार,यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष औटी, शिवाजी जुंदरे, पोलीस उप निरीक्षक विशाल पवार यांच्यासह मोहल्ला कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# हैदराबादचा कोलकातावर मोठा विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबादने आयपीएल २०२५च्या इतिहासातील तिसरी सर्वात मोठी धावसंख्या उभारत कोलकाता नाईट रायडर्सचा मोठा पराभव केला आहे. हैदराबादच्या फलंदाजांनी यंदाच्या मोसमातील अखेरच्या सामन्यात रौद्र रूप धारण करत धावांचा पाऊस पाडला. संघाने ट्रॅव्हिस हेड-अभिषेक शर्माची सुरुवात आणि हेनरिक क्लासेनच्या शतकासह २७८ धावांचा डोंगर उभारला आणि केकेआरचा ११० धावांनी मोठा विजय नोंदवला.



आयपीएलच्या इतिहासातील तीन वेळचा चॅम्पियन संघ असलेल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा हा धावांच्या अनुषंगाने सर्वात मोठा पराभव आहे. आयपीएल २०२५चा हंगाम या दोन्ही संघांसाठी खूप वाईट होता, आयपीएलच्या गेल्या हंगामातील विजेते आणि उपविजेते असलेले हे संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले होते, पण हंगामाच्या शेवटच्या सामन्यात हैदराबादने त्यांची पूर्ण ताकद दाखवली

हैदराबादने या सामन्यात प्रथम फलंदाजी केली आणि ट्रॅव्हिस हेडने अभिषेक शर्मासह केवळ सात षटकांत ९२ धावांची भागीदारी रचली. यानंतर हेड आणि क्लासेन यांनी कोलकाताच्या गोलंदाजांची धुलाई केली. दोघांनी मिळून ८३ धावा जोडल्या आणि १३व्या षटकापर्यंत संघाने १७५ धावा केल्या. क्लासेनची वादळी खेळी पहायला मिळाली, क्लासेनने प्रथम फक्त १७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि नंतर ३७व्या चेंडूत आपले शतक पूर्ण केले. हैदराबादने २० षटकांत तीन गडी गमावून २७८ धावा केल्या, जी आयपीएलच्या इतिहासातील तिसरी सर्वोच्च धावसंख्या आहे.

प्रत्युत्तरात केकेआरचा संपूर्ण संघ १६८ धावांमध्ये सर्वबाद झाला. सुनील नरेनने चांगली सुरुवात केली, पण तो लवकर बाद झाला. यानंतर मनीष पांडे आणि हर्षित राणा यांनी अर्धशतकी भागीदारी केली संघाला २०० अधिक धावांपेक्षा पराभवापासून वाचवले. मनीष पांडेने २३ चेंडूत दोन चौकार आणि तीन षटकारांसह ३७ धावा केल्या. हर्षित राणाने २१ चेंडूत दोन चौकार आणि तीन षटकारांसह ३४ धावा केल्या, तर रमणदीप सिंग पाच चेंडूत १३ धावा करत बाद झाला. याशिवाय केकेआरचे इतर सर्व फलंदाज फेल ठरले. हैदराबादकडून हर्ष दुबे, इशान मलिंगा आणि जयदेव उनाडकट यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले.

दोन्ही संघांसाठी हंगामाची सुरुवात ज्या पद्धतीने झाली त्याच पद्धतीने सांगता झाली. कोलकाता संघाला हंगामातील पहिल्याच सामन्यात दारुण पराभव पत्करावा लागला होता. आणि शेवटच्या सामन्यातही या संघाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. दुसरीकडे सनरायझर्सने आयपीएल २०२५मध्ये त्यांच्या पहिल्याच सामन्यात २८६ धावांचा डोंगर उभारला होता. त्या सामन्यात इशान किशनने शानदार शतक झळकावले होते आणि संघाला मोठा विजय मिळाला होता. आता त्यांच्या शेवटच्या सामन्यातही सनरायझर्सने २७८ धावांची मोठी धावसंख्या उभारली, ज्यामध्ये हेनरिक क्लासेनचे वादळी शतक होते आणि नंतर मोठा विजय मिळवला.

## अवघ्या ३७ चेंडूत शतक ठोकून क्लासेनची युसूफ पठाणशी बरोबरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये हेनरिक क्सासेनने अवघ्या ३७ चेंडूत शानदार शतकी खेळी केली. यासह त्याने युसूफ पठाणच्या विक्रमाची बरोबरी केली आहे.

हेनरिक क्लासेन आपल्या विस्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो. या हंगामातील शेवटच्या सामन्यात हैदराबादने आपल्या फलंदाजीक्रमात बदल केला. क्लासेनला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवले. या संधीचा त्याने पुरेपूर फायदा घेतला. सुरुवातीपासूनच त्याने कोलकाता नाईट रायडर्सच्या गोलंदाजांवर हल्लाबोल केला.

आधी हेडसोबत मिळून त्याने केकेआरच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. त्यानंतर त्याने ईशानसोबत मिळून धावांचा डोंगर उभारला. यादरम्यान त्याने अवघ्या १७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर ३७ चेंडूत त्याने शतक पूर्ण केले. हे आयपीएल २०२५ स्पर्धेतील दुसरे सर्वात वेगवान शतक ठरले आहे. यासह आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील तिसरे सर्वात वेगवान शतक ठरले आहे.



आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात सर्वात वेगवान शतक झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत ख्रिस गेल अव्वल स्थानी आहे. गेलने अवघ्या ३० चेंडूत आपले शतक पूर्ण केले होते. त्याने २०१३मध्ये पुणे वॉरियर्स इंडियाविरूद्ध खेळताना हे शतक केले होते. त्यानंतर याच हंगामात १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने गुजरात टायटन्सविरूद्ध फलंदाजी करताना अवघ्या ३५ चेंडूत आपले शतक पूर्ण केले होते. राजस्थान रॉयल्सचा माजी फलंदाज युसूफ पठाण या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. त्याने ३७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले होते. हे या स्पर्धेच्या इतिहासातील तिसरे सर्वात वेगवान शतक आहे. आता क्लासेनने ३७ चेंडूत आपले शतक पूर्ण करत युसूफ पठाणच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे.

## माझ्याकडे पुरेसा वेळ, विचार करून निर्णय घेईन!

■ धोनीचा निवृत्तीबाबत खुलासा



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्सने गुजरात टायटन्सवर ८३ धावांनी विजय मिळवला. हा चेन्नईचा या हंगामातील शेवटचा सामना होता. असे म्हटले जात होते की, हा धोनीचा आयपीएल कारकिर्दीतील शेवटचा सामना असेल, मात्र सामन्यानंतर धोनीने निवृत्तीबाबत मोठा खुलासा केला आहे.

विजयानंतर चेन्नईचा कर्णधार धोनी म्हणाला, आम्हाला या हंगामात चांगली कामगिरी करता आली नाही, पण आज आम्ही चांगली कामगिरी केली. माझ्याकडे निर्णय घेण्यासाठी चार-पाच महिने आहेत. त्यामुळे घाई करण्याची गरज नाही. शरीर तंदुरूस्त ठेवणे गरजेचे आहे.

धोनी पुढे म्हणाला, खेळाडू फिट असणे गरजेचे आहे. खेळाडूंनी कामगिरीवरून निवृत्ती घेण्याचे ठरवले, तर काही खेळाडू बाविसाव्या वर्षीच निवृत्त होतील. मी निवृत्ती घेतोय असे मी म्हणत नाही, पण मी परत येईल असेही म्हणत नाहीये. माझ्याकडे पुरेसा वेळ आहे. मी विचार करेन आणि निर्णय घेईल.

## धैर्य, मेहनत आणि जिद्दीने करूण नायरचे पुनरागमन

**मुंबई : प्रतिनिधी**

करुण नायर, भारतीय क्रिकेटमधील एक असा खेळाडू ज्याने आपल्या तिहेरी शतकाने क्रिकेटविश्वाला थक्क केले, पण त्यानंतरच्या काळात त्याला संधी मिळवण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. त्याच्या पुनरागमनाचा प्रवास हा धैर्य, मेहनत आणि जिद्दीने भरलेला आहे.

करुण नायरने २०१६मध्ये इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत चेन्नईत नाबाद त्रिशतक ठोकले. या खेळीत त्याने ३२ चौकार आणि चार षटकार मारले. यासह भारताने ७५९ धावांचा डोंगर उभारत सामना एक डाव आणि ७५ धावांनी जिंकला. ही खेळी इतकी प्रभावी होती की, त्याला क्रिकेटविश्वात 'भविष्यातील स्टार' म्हणून पाहिले जाऊ लागले, मात्र या यशानंतर करुणची कारकीर्द अपेक्षेप्रमाणे पुढे सरकली नाही.

२०१७मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत त्याला फक्त चार डाव खेळण्याची संधी मिळाली आणि अपयशामुळे त्याला संघातून वगळण्यात आले. त्यानंतर तब्बल आठ वर्षे त्याला भारतीय कसोटी संघात स्थान मिळाले नाही. हा कालावधी करुणसाठी त्याच्यासाठी अंधारमय रात्रीसारखा होता. तरीही करुणने आपल्या मनातील ज्योत विझू दिली नाही.

देशांतर्गत क्रिकेटच्या रणांगणावर करूणने धावांचे डोंगर रचले. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सात हजारांहून अधिक धावा, १९ शतके, ३४ अर्धशतके. २०१५मध्ये रणजी ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात तमिळनाडूविरुद्ध ३२८ धावांची खेळी खेळून त्याने कर्नाटकाला विजेतेपद मिळवून दिले.

करुणने इंग्लंडमधील काउंटी क्रिकेटमध्येही आपली छाप पाडली,



पण भारतीय संघात पुनरागमनासाठी त्याला संधी मिळाली नाही. या काळात त्याला अनेकदा निराशा आणि मानसिक दबावाचा सामना करावा लागला.

२०२४-२५च्या विजय हजारे ट्रॉफीत करूणने विदर्भाचा कर्णधार म्हणून जबाबदारी सांभळताना आठ सामन्यांच्या सात डावांत ७५२ धावा कुटल्या. यात त्याने पाच शतके आणि एक अर्धशतक फटकावले. या कामगिरीमुळे करूण पुन्हा चर्चेत आला, पण चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ आणि इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याला भारतीय संघात स्थान मिळाले नाही.

करूणच्या संघर्षाला खरी गती मिळाली ती आयपीएल २०२५मध्ये. दोन हंगाम न विकल्या गेल्यानंतर दिल्ली कॅपिटल्सने त्याला ५० लाख रुपयांना विकत घेतले. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात इम्पॅक्ट खेळाडू म्हणून त्याने ४० चेंडूत ८९ धावा ठोकल्या, ज्यात १२ चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. या खेळीतील प्रत्येक फटका म्हणजे त्याच्या आठ वर्षांच्या प्रतीक्षेचा विजय होता.

या वादळी खेळीनंतरही दिल्ली संघाला सामना जिंकता आला नाही, तरी करुणच्या फॉर्म आणि आत्मविश्वासाचे कौतुक झाले. मुख्य म्हणजे त्याच्या कसोटी पुनरागमनाच्या आशा पल्लवित झाल्या आणि संधीही मिळाली आहे.


### २,९०० दिवसांनंतर संधी

करूण नायरने २०२२मध्ये एका सोशल मीडिया पोस्टद्वारे आपली व्यथा व्यक्त केली होती, ज्यामध्ये तो म्हणाला, 'मला फक्त एक संधी द्या.' ही पोस्ट क्रिकेटप्रेमींमध्ये चर्चेचा विषय ठरली आणि त्याच्या संघर्षाची तीव्रता अधोरेखित झाली. तब्बल २,९०० दिवसांनंतर २०२५मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी त्याला भारतीय कसोटी संघात स्थान मिळाले. ही संधी त्याच्यासाठी आणि त्याच्या चाहत्यांसाठी भावनिक क्षण आहे.

## क्रिकेटपटू प्रियांक पांचाळची निवृत्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलनंतर भारतीय संघ इंग्लंड दौरा करणार आहे. या दौऱ्यात भारतीय संघ इंग्लंडशी पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. याआधीच भारताचा क्रिकेटपटू प्रियांक पांचाळने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याचा रेकॉर्ड उत्कृष्ट राहिला आहे, पण त्याला भारतीय संघाकडून खेळण्याची संधी मिळाली नाही.



प्रियांक पांचाळ हा घरगुती क्रिकेटमध्ये गुजरात संघाकडून खेळायचा. प्रियांकने निवृत्तीची घोषणा केल्यानंतर गुजरात क्रिकेट असोसिएशनने त्याला शुभेच्छा दिल्या. गुजरात क्रिकेट असोसिएशनने आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून केलेल्या पोस्टमध्ये असे लिहिली आहे की, हा एका युगाचा अंत आहे. प्रियांकने भारत अ आणि गुजरात संघाचे सर्व फॉरमॅटमध्ये नेतृत्व केले. आम्ही त्याच्या समर्पणाला सलाम करतो आणि त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.'

प्रियांक पांचाळने २००८मध्ये प्रथम श्रेणी क्रिकेट खेळायला सुरुवात केली. त्याने १२७ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये आठ हजार ८५६ धावा केल्या, ज्यात २९ शतके आणि ३४ अर्धशतकांचा समावेश आहे. लिस्ट-ए मध्ये त्याच्या नावावर तीन हजार ६७२ धावांची नोंद आहे. २०१६-१७मध्ये गुजरातला पहिले रणजी करंडक जिंकण्यास प्रियांक पांचाळने महत्त्वाची भूमिका बजावली. याशिवाय त्याने विजय हजारे ट्रॉफी (२०१५-१६) आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी (२०१२-१३ आणि २०१३-१४)देखील जिंकली आहे.

## सिकंदर रझाची शानदार खेळी

**कराची : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेचा स्टार खेळाडू सिकंदर रझा याने इंग्लंडमध्ये कसोटी सामना खेळून झाल्यानंतर तो पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेतील अंतिम सामना खेळण्यासाठी २० मिनिटे शिल्लक असताना मैदानात दाखल झाला. विशेष म्हणजे त्याने प्रतिकूल परिस्थितीत आपल्या लाहोर कलंदर्स संघाला तिसरे पीएसएल विजेतेपद मिळवून दिले.

क्वेटा ग्लॅडिएटर्सविरुद्ध रझा जेव्हा फलंदाजीसाठी मैदानात उतरला, तेव्हा लाहोरला शेवटच्या २० चेंडूंत ५७ धावांची गरज होती. प्रवासाने त्रस्त होऊनही त्याने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित केले. त्याने मोहम्मद आमिरच्या गोलंदाजीवर पहिल्या दोन चेंडूंवर चौकार आणि षटकार ठोकला, ज्यामुळे सामन्याचा रंग पालटला. शेवटच्या षटकात, फहीम अश्रफच्या गोलंदाजीवर आठ धावांची गरज असताना रझाने पॉइंटवरून एक फ्लॅट षटकार मारला, तर त्यानंतर मिड-ऑनवरून विजयी चौकार ठोकत लाहोरला एक चेंडू शिल्लक असताना विजय मिळवून दिला.

## फिट इंडिया प्रमाणपत्राने रनथॉन सायकलिंग ग्रुप सन्मानित

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेलच्या रनथॉन सायकलिंग ग्रुपला भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा क्रियाशील प्रेस क्लबचे रायगड जिल्हाध्यक्ष सय्यद अकबर यांच्या हस्ते फिट इंडिया प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभियानांतर्गत नमो फिट इंडिया (भारत सरकार) यांच्याकडे नोंदणीकृत झालेले फिट इंडिया प्रमाणपत्र बहाल करण्यात येते. देशामध्ये शारीरिक स्वास्थ्याचे महत्त्व वाढीस लागावे म्हणून केंद्र सरकारने हे अभियान राबविले आहे.



प्रमाणपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम रविवारी (दि. २५) नवीन पनवेल येथे झाला. या वेळी क्रियाशील प्रेस क्लबचे उपाध्यक्ष प्रदीप ठाकरे, कोषाध्यक्ष चंद्रकांत शिर्के, सदस्य भूषण साळुंखे आदी उपस्थित होते.

नोव्हेंबर २०१४मध्ये रनथॉन सायकलिंग ग्रुप नवीन पनवेलचे संस्थापक पुरणसिंग मेहरा यांनी सायकलिंग आणि समाजसेवा अशी अनोखी सांगड घालत ग्रुपची स्थापना केली आहे. आजमितीला तब्बल ३५० सदस्य या संस्थेमध्ये सक्रिय आहेत. सायकलिंगसोबतच अपघातग्रस्तांना मदत मिळवून देणे, रक्तदान करणे, जखमी व्यक्तींना इस्पितळात तातडीने हलवणे, शिक्षणासाठी मदत करणे अशा समाजसेवेसाठी हा ग्रुप ओळखला जातो.

सायकलिंग ग्रुपचे साजन शहा, हेमंत जंगम, आदिती पाटील, जनेत लॉरेन्स, अनीता खेडेकर, क्रिती गुप्ता यांच्यासह सायकलिंग ग्रुपची यशस्वी घोडदौड पुढच्या पिढीमध्ये घेऊन जाणारे छोटे सायकल वीरदेखील उपस्थित होते. जनेत लॉरेन्स यांनी आभार मानले.





**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली कोपर स्मशानभूमी बचावासाठी ग्रामस्थांनी जनआंदोलन उभारले. पुन्हा कारवाईला आल्यास सिडकोला जशास तसे उत्तर देण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.**








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com